# सामसूम

## ( दोन अंकी नाटक )

चं प्र देशपांडे



# सामसूम

## ( दोन अंकी नाटक )

**-- चं. प्र. देशपांडे**

**--- अंक पहिला ---**

| | | |
|---|---|---|
| बेडरूम | दिवाणखाना | दवाखाना |
| स्वयंपाकघर | रंगमंच | स्टडीरूम |
| | प्रेक्षक | |

मागे अर्ध-गोलाकार दिवाणखाना. समोर दोन खिडक्या. मधे दरवाजा. उजव्या हाताला दोन दारे -- मागचे दार दवाखान्याकडे जाणारे आणि पुढचे स्टडीरूमकडे जाणारे. डाव्या हाताला तशीच दोन दारे. मागचे बेडरूमकडे जाणारे आणि पुढचे स्वयंपाकघराकडे जाणारे. दारे खिडक्यांना खेडवळ पडदे. पुरेसे फर्निचर. फुलदाणीत ताजी फुले.

पडदा उघडतो तेव्हा डॉ.अरविंद (२८) दिवाणखान्यातल्या टेबलावरची पुस्तके उचलून स्टडीकडे घेऊन जातो. समोरच्या दारातून विठू -- नोकर-- (२०) हा दोन हातात दोन भरलेल्या बादल्या घेऊन येतो आणि स्वयंपाकघराकडे जातो. बेडरूममघून डॉ. सुनेत्रा ( २७ ) बाहेर येते आणि बसते. विठू रिकाम्या बादल्या घेऊन स्वयंपाकघरातून येतो आणि समोरच्या दारातून बाहेर जातो. स्टडीतून डॉ. अरविंद बाहेर येतो.

अरविंद: आदल्या दिवशीचं वर्तमानपत्र इथं दुसऱ्या दिवशी दुपारी मिळणार !

सुनेत्रा: असं म्हणण्यापेक्षा आपलं कॅलेंडरच जर एक दिवस मागे लावून ॲडजस्ट करून घेतलं तर काय होईल ?

अरविंद: चालेल म्हणा. पण माणूस सवयींचा गुलाम असतो हेच खरं.

सुनेत्रा: आपण हे निर्णय घेतले तेव्हा नव्या सवयींची गुलामगिरी पत्करावी लागेल हे माहीत होतंच आपल्याला !

अरविंद: बोअरचं पाणी, भन्नाट वारा, कडक ऊन आणि बाकी सगळी सामसूम !

सुनेत्रा: त्यापेक्षा ' शांतता ' म्हण ना ! ' सामसूम ' काय ! इथं काय गुन्हेगारी किंवा भुताटकी आहे का ?

अरविंद: निसर्गाचा एवढा प्रचंड रेफरन्स वाटतो ना इथं जगण्याला की माणसं इथं जवळजवळ नसल्यासारखीच होतात !-- अशी सामसूम !

सुनेत्रा: बरं, वापर तोच शब्द ! ( क्षणभरानं --) इथं कुणी पेशंट आला तरी तो आभाळातनं देवानं पाठवल्यासारखा वाटेल. ( एकदम वैतागून -- ) ए, हे पडदे एक ताबडतोब बदलायला हवेत बाबा ! कसलं बटबटीत वाटतंय सारखं !

अरविंद: आपण येणार म्हणून प्रेमानं लावून ठेवलेत ते -- आपली गैरसोय होऊ नये म्हणून ! सवयी बदलायच्या -- हे ठरलंय आपलं ! ( इथं विठू पुन्हा दोन भरलेल्या बादल्या घेऊन येतो. स्वयंपाकघरात जातो.)

सुनेत्रा: गरीब आहे अगदी. इतकी आज्ञाधारक माणसं कुठं पाह्यला मिळणार नाहीत.

अरविंद: परिस्थितीमुळंच असेल ! ( बादल्या आत ठेवून विठू बाहेर येतो.) विठू, पाणी झाल्यावर -- हं, झालं ना पाणी -- हं -- आता बाहेर तो दवाखान्याचा बोर्ड लावून टाक. कसा लावायचा ते कळलं ना ?

विठू: जी ! ( जातो. )

अरविंद: हा समोरचा दरवाजा फारसा वापरूच नये !

सुनेत्रा: म्हणजे इथल्या माणसांशी संबंध -- थ्रू दवाखानाच फक्त -- जरा अंतर राखणं -- अं ?

अरविंद: निदान सुरुवातीला तरी. पुढं आपोआप काही गोष्टी ॲडजस्ट होत जातील तशा जातील !

सुनेत्रा: मला मस्त, फ्रेश वाटतंय इथं !

अरविंद: इथं बरीच वर्षं राहिल्यावरही सारखं असंच फ्रेश वाटतं की सध्या हा एक नवा बदल आहे म्हणून वाटतंय -- हे अर्थात् सावकाशीनं कळेल !

सुनेत्रा: पण आत्ता फ्रेश वाटतंय मला तर वाटू दे नं ! पुढचं कशाला हवंय !

अरविंद: बदलामुळं फ्रेश वाटत असेल तर मग याच्या सवयीनं बोअर होईल ! बोअरचं पाणी आणि बोअरडम !

सुनेत्रा: काय गाढ झोप लागली काल ! मस्त !

अरविंद: तुला पण सगळं नवीन नवीन अतिशय इंटरेस्टिंग वाटतं. सेन्स ऑफ वंडर बराच आहे तुझ्यात.

सुनेत्रा: आहे. बराच आहे. पण मर्यादित. बरा आहे.

अरविंद: शहरात दवाखाना काढणं, काही काळ सगळा तोटा सहन करणं -- हे आपल्याला अशक्य वाटलं म्हणून खरं तर आपण इकडे आलो ! याला कुणी आदर्शवाद समजलं की मला गिल्टी वाटतं ! (क्षणभरानं -- )

' आदर्शवाद ' हा शब्द खरं तर नकोच आहे भाषेत ! सगळे त्या त्या वेळचे आपल्याला सोयीस्कर वाटणारे निर्णय असतात ! आदर्शवादी असण्यातही शरीरातली रसायनं कारणीभूत असतात ! आणि जनुकं ! कशालाही  आदर्शवाद म्हटलं तर नको तो ढोंगीपणा ॲड होतो ना आपल्यात ! आणि तो वागवतही राहावं लागणार मग !

सुनेत्रा: मग सांगत बसायचं सगळ्यांना -- आदर्शवाद नाहीय, आदर्शवाद नाहीय -- असं ! ( विठू येतो. )

विठू: मालक आलेत --

अरविंद: ( उठून, दवाखान्याच्या दाराकडे जात -- ) अरे वा ! या-- ( सुभानराव -- ३५ -- येतात. विठू जातो. सुनेत्रा उठते. ) बसा !

सुभानराव: (बसत -- ) कसं वाटतं इथं -- झोपबीप लागली का नाय ! मोकळंढाकळं हाय हितं ! तुमच्या शहरावाणी बंदिस्त नाय !

अरविंद: चांगला वाटतोय बदल !

सुभानराव: डाक्तरीणबाईंना बी ठीक वाटतंय न्हवं !

सुनेत्रा: ठीक आहे.

सुभानराव: हळूहळू येतील पेशंट -- आजूबाजूच्या वस्त्यांस्नीबी माहिती व्हायला पायजे. त्येच्यासाठी सत्यनारायन करा येक. आन् उद्गाटन करा दवाखान्याचं ! लोकं येतील -- माहिती व्हईल. दर श्रावणात आपला असतो येक सत्यनारायन ! तालुक्यास्नं भटजी आनतो !

अरविंद: मी सत्यनारायण वगैरे करत नाही. उद्घाटनाचीही तशी गरज नाही. पेशंट आले की दवाखाना सुरू. माहिती होत राहील.

सुभानराव: आमी बी सांगूच म्हना समद्यांना ! सत्यनारायन कराच आसं काई न्हाई ! तुमची मर्जी ! तुमी भाईरनं आलेले ! तुमच्या इचारानं वागा !

अरविंद: मला समारंभ फारसे आवडत नाहीत.

सुभानराव: थोडं जनतेच्या मतानं चालायचं हो ! जनतेची सेवा करनारे आपन !

अरविंद: सेवा वगैरे काही नाही. तपासणार, औषधं देणार. मतांचा काही प्रश्न नाही.

सुभानराव: आमच्याकडं बी मतांचा प्रश्न नसतोच म्हना ! आमच्यासारखीच करतो आमी समद्यांची मतं ! पन तुमाला ह्ये न्हाई बरं का !

सुनेत्रा: मी चहा करून आणते, तोपर्यंत ज्या गोष्टी ठरवायच्या राहिल्यात ते बोलून घ्या. ( जाते. )

अरविंद: हो. ते महत्त्वाचं आहे. एक म्हणजे तुम्ही दिलेला नोकर -- हा विठू -- त्याचा पगार ठरवणे. आणि दुसरं म्हणजे तुम्ही आम्हाला वापरायला दिलेला हा बंगला. त्याचं भाडं ठरवणे. आल्यावर बघू असं तुम्ही म्हणाला होतात.

सुभानराव: अवो डाक्तर उलट तुमी हितं आला, हितं ऱ्हानार ह्ये आमच्यावरच उपकार हैत असं मानतो आमी ! किती पेशंट येत्यात, काय मिळतं ते बगून ठरवू मग ! आत्ता ऱ्हाऊं द्या !

अरविंद: नाही, उपकार वगैरे काही नाही. दुसरं काहीतरी महत्त्वाचं सोडून आम्ही इथं आलोय असं काही नाही. जमलं तर इथं राहू, नाहीतर परतसुध्दा जाऊ. आमचं तसलं काही नाही.

सुभानराव: परत जायचं नका बोलू हो !

अरविंद: पण --

सुभानराव: बरं, बोला.

अरविंद: पहिलं म्हणजे विठूचा पगार.

सुभानराव: त्याला कसला पगार ? खायलाप्यायला मिळतंय ते मोप झालं ! हितं मोप हाईत असले -- येक तुमास्नी दिला ! काई फरक पडत न्हाई --

अरविंद: तसं नाही. त्याला बोलावू या. विठू S ए, विठू S ( विठू येतो. ) हं, तू इथं काम करणार, अं !

विठू: मालकानी सांगिटलंय --

अरविंद: पगार किती हवा ?

सुभानराव: त्येला काय इचारताय -- आमच्या सांगण्याच्या भाईर न्हाई त्यो --

अरविंद: काम तो करणार आहे, त्याला बोलू द्या.

सुभानराव: त्यो बोलनार बी नाय ! हितं शेरावानी काय करू नगा -- न्हाईतर आसं करा -- ज्यूनखौन द्या पन्नास रुपये महिना --

अरविंद: बास ? इतके कमी ?

सुभानराव: अवो मीच पोशितो यास्नी ! यांच्या मागच्या लई पिढ्यापास्नं आमास्नी द्येव मानत्यात ह्ये ! तुमचंबी उत्पन्न किती हुतंय बगा -- तुमास्नी बी परवडाय नगो ?

अरविंद: नाही परवडलं तर नोकर काढून टाकू. तसंही नाही जमलं तर परत जाऊ !

सुभानराव: त्येच व्हाया नगो ना ! कसं का आसंना तुमी हिकडं आलायसा तर आता परत जावं लागू ने हींच आमची विच्छा हाय ! तुमचं पेशंटबी हितलंच, मी पाळलेल्या या मानसांमदलंच येनार हाईत ! त्येंचं बिल मीच द्येनार ! आता बैलं, म्हैशी, गायी यांस्नी काई जालं तर खर्च करतो का नाय ! तसंच ह्ये ! काय कमी जास्ती वाटलं तं सांगा. सद्या फोन आपल्या घरचा वापरा. आजूबाजूला आनी वस्त्या हैत -- थितलं बी येतील पेशंट !

अरविंद: ठीक आहे. याचा पगार जेवूनखाऊन महिना शंभर रुपये ठरवू सध्या. हाही बरोबर आहे की नाही कोण जाणे. ( विठूला --) कबूल आहे ?

विठू: काई नगं जी --

सुभानराव: कबूल म्हन भडव्या ! --

विठू: जी ! --

अरविंद: ठीक आहे. जा आता. ( विठू जातो. ) आता या बंगल्याचं भाडं !

सुभानराव: अवो ऱ्हाऊं द्या ! काय उगाच ! आमच्याबी भावनेचा मान राका जरा !

अरविंद: म्हणजे काय तुमच्या चांगूलपणाचा फायदा घेऊ ?

सुभानराव: अवो तुम्ही जसे सेवाभावी ऱ्हाई तसंच आमी बी चांगले ऱ्हाई ! पन म्हनावं ! आमी तुमाम्नी सेवाभावी म्हंतो, तुमी आमाम्नी चांगलं म्हना ! झाली फिटंफाट ! ( हंसतात.)

अरविंद: तसं नव्हे ! ( सुनेत्रा चहाचा ट्रे घेऊन येते.)

सुनेत्रा: ( चहा वाटत -- ) भाडं ठरवलेलं बरं !

सुभानराव: अहो आमचा चांगुलपना असूं द्या यवढा ! सद्या ऱ्हाऊं द्या ! उत्पन्न किती हुतंय, काय जमतंय बगा, मग ठरवू ! माझं म्हनाल, तर मला भाडं नगं !

अरविंद: हे ठीक आहे. आम्हाला जमेल तसं देऊ. उगीच तेच ताणत बसण्यात काही अर्थ नाही.

सुभानराव: आता कसं ! त्येच म्हनतोय न्हवं आमी ! हितं भली थोरली हीर हाय आमची ! एक भांडंभर पानी तुमी प्येला तर काय आटत न्हाई ती ! काई लागलंसवरलं सांगा. जीप, मोटरसायकल लागली त घ्या. बाकी समदं ब्येस हाय हितं ! जरा साप-इंचू निगतेत त्येवडं सांबाळा ! हा इटू हायेच. भ्यायचं कारन न्हाई ! मदनंमदनं येखंड जाळा घरात म्हंजी साप येनार न्हाई ! विठू हायेच ! घाबरू नगं सा ! जाऊ काय ?

अरविंद: हं. आभारी आहे.

सुभानराव: इट्या S ( विठू येतो.) लक्ष ठेव भोसडीच्या ! काय ! तुजी जिम्मेवारी ! कळलं काय !

विठू: जी !

सुभानराव: बरं, जातो ! चा बेस हुता बरं का !

अरविंद,सुनेत्रा: नमस्कार, या ! ( सुभानराव जातात.)

अरविंद: (विठूला --) बोर्ड लावलास ?

विठू: लावतोय जी --

सुनेत्रा: उगीच सारखं जी जी जी जी करू नकोस. आम्हाला नाही आवडत ते !

विठू: जी !

सुनेत्रा: ( हसून -- ) बरं, जा ! ( विठू जातो.) आपण इकडं यायचं ठरवलं खरं, पण इकडं सापबीप असतील हे आपल्या डोक्यात नव्हतं आलं. हे असले प्रकार जरा कठीणच जातील आपल्याला.

अरविंद: आता जे आहे ते आहे. पाहू. इथले लोक शहरात आले की ट्रॅफिकला घाबरतात -- आपण घाबरत नाही ! तसंच हे ! सवयीनं जाईल आपलीही भीती !

सुनेत्रा: सुरुवातीचे साप कसे भेटतात त्यावर ते अवलंबून आहे !

अरविंद: सुभानरावांचं राज्य आहे इथं ! सापांना योग्य त्या सूचना द्यायला सांगू त्यांना !

सुनेत्रा: खरंच, किती धोक्यात राहतात ही माणसं !

अरविंद: त्यांना नाही धोके वाटत हे ! बरं ते जाऊं दे. तू स्वयंपाकाचं बघ, मी दवाखान्याचं बघतो. स्त्री पेशंटस् तुझे, पुरुष पेशंटस् माझे. मुलं पेशंटस् असल्यास त्यांना घेऊन स्त्री आलीय की पुरुष यावर ते ठरेल.

सुनेत्रा: पण सापबीप जास्त निघायला लागले तर मला काही इथं राहणं जमायचं नाही. हे सगळं कॅन्सल करावं लागेल. साप नसते तर काही प्रॉब्लेम नव्हता मग !

अरविंद: इथं राह्यचं ठरलंय ना, मग इथलं जीवन जगायची तयारीच ठेवायची ! ( बाहेर काहीतरी पडल्याचा आवाज येतो. अरविंद घाईनं बाहेर जातो. येताना विठूला आधार देत आणतो.)

सुनेत्रा: काय झालं ?

अरविंद: धडपडला, दुसरं काय ! पायाला लागलंय त्याच्या ! आपला पहिला पेशंट ! विठू !

सुनेत्रा: दवाखाना सुरू करून द्यायचं कामही त्या शंभर रुपयांत केलंन बिचाऱ्यानं ! ( ती दोघं विठूचं ड्रेसिंग करतात. विठू ' नगं,नगं ' म्हणत असतो. इथे हे दृश्य संपते. पुढचे दृश्य सुरू होते तेव्हा समोर कुणी नाही. समोरचे दार बंद. स्वयंपाकघरातून सुनेत्रा येते. बसते. नंतर काही क्षणांनी दवाखान्यातून अरविंद येतो.)

अरविंद: सुभानराव सांगतायत बरं का आजूबाजूला ! शेजारच्या वस्तीचे प्रतापराव येऊन गेले. तेही मोठे जमीनदार आहेत. त्यांनीही अशीच काही कुटुंबं पाळलेली आहेत. त्यांचीही पध्दत हीच. त्यांच्या माणसांचं बिल ते देणार.

सुनेत्रा: म्हणजे हे लोक तशी यांची काळजी बरी घेतात असं दिसतंय. नुसतंच राबवत नाहीत.

अरविंद: जमेल थोडक्यात तेवढी काळजी घेणार, नाहीतर मरू देणार हे उघडच आहे ! त्यांच्या दृष्टीनं उपयुक्त जनावरंच ही !

सुनेत्रा: असं कुणाच्यातरी अधिकाराखाली सतत जगावं लागणं हे घाणेरडंच आहे !

अरविंद: शहरात काय असतं ? हे ' जी मालक ' म्हणतात, आपण ' यस सर ' म्हणतो ! आपलं भवितव्य दुसऱ्याच्या हातात आहे हा अनुभव सगळ्यांनाच येतो.

सुनेत्रा: पण सगळं सारखं नाही ! तिथं शहरात आपापला पगार असतो, मोबदला असतो, खर्च कसा करायचा हे तुम्ही ठरवू शकता ! इथं हे काहीच नाही !

अरविंद: ते आहे म्हणा ! ( विठू येतो. नुसता उभा राहतो.) काय रे विठू, काय हवंय ? ( तो काही बोलत नाही. खाली पाहात नुसता उभा.) काय झालं ? कुठं जायचंय का तुला ? घरी जाऊन यायचंय ? ( तो बोलत नाही.)

सुनेत्रा: -- आणि बँडेज सोडून टाकलंस वाटतं ! का रे !

विठू: मालकास्नी सांगू नगा -- ह्ये -- लागल्यालं --

सुनेत्रा: ( हसून --) का ? चुकून पडलास, लागलं ! काय गुन्हा आहे का काय त्यात !

विठू: सांगू नगासा --

अरविंद: का ? काय होईल ? काहीही होणार नाही !

विठू: ( रडायला लागत --) नगा सांगू --

सुनेत्रा: अरे --

अरविंद: ( जवळ जात --) बरं, नाही सांगत, जा तू, काही काळजी करू नकोस -- खरं तर हे बोलायचं आमच्या लक्षातही राहिलं नसतं -- असू दे -- अं -- रडू नको -- ( समजावत-- ) नाही सांगत -- अं – जा आता --

सुनेत्रा: काय वेडा आहे --

अरविंद: असू दे -- नाही म्हणजे नाही -- सांगायचं नाही ! ठरलं ! पक्कं ! ( त्याच्या पाठीवर थोपटत --) कुछ चिंता मत करो, जाव ! हम चुप रहेंगे !

सुनेत्रा: अरे चल ! काही नाही ! अं ! ( विठू डोळे पुसत जातो. ) फारच घाबरत जगतात माणसं ही ! शी !

अरविंद: दुसऱ्या कसल्या जगण्याच्या शक्यता माहीतच नाहीत यांना ! मला असं कळलं की या लोकांनी इथून चाळीसपन्नास किलोमीटरवरचं गावही पाहिलेलं नाही !

सुनेत्रा: खरं आहे हे ?

अरविंद: अर्थात् बरीच गावं पाहून तरी माणसाचं काय भलं होतं तेही तपासावंच लागेल !

सुनेत्रा: म्हणजे रोजगाराच्या दुसऱ्या काही संधी आहेत का, यांच्यासारखेच दुसरे मजूर कसे जगतात -- यांना काही माहिती नाही ! समोर आहे तेवढंच सत्य !

अरविंद: आपलं तरी काय आहे ! फक्त विस्तार कमीजास्त ! बाकी तेच !

सुनेत्रा: असं सरसकट बोलून उडवून लावण्यासारखं नाही वाटत हे मला -- हे जास्त वाईट आहेच !

अरविंद: तुला सेंटिमेंटल व्हायचंय का ? मी त्याच्या आड येत नाही ! एंजॉय इट !

सुनेत्रा: काय बोलतोयस तू हे अरविंद !

अरविंद: माणसांचे जगायचे असे हजारो प्रकार असतील ! आपण भावनिक होऊन काय करणार !

सुनेत्रा: मालक पाहतील म्हणून त्यानं ड्रेसिंग काढून टाकलं -- हे पाहूनही भावनिक व्हायचं नाही ?

अरविंद: माझं म्हणणं -- काही अर्थ नाही त्याला. आपल्या आयुष्याकडे बघूनही दुसऱ्या काहींच्या डोळ्यांत पाणी येऊ शकेल ! बिचारे कुठं जगाच्या कोपऱ्यात जाऊन पडले -- असं वाटून ! नाही ?

सुनेत्रा: कुणालाच कुणाबद्दल काहीच वाटायची गरज नाही -- हे काही तत्त्वज्ञान होऊ शकत नाही.

मानवी भावभावनांचं महत्त्व आहेच ! नाहीतर जगणं कसलं ते !

अरविंद: आपले स्वत:चे हजार प्रॉब्लेम्स आहेत !

सुनेत्रा: ते असणारच रे !

अरविंद: ए, जाऊं दे, चल !

सुनेत्रा: तसं नाही, ॲप्रोचचा प्रश्न आहे !

अरविंद: ते झालं ना पण ! होऊन गेलं ते ! खूप वेळ झाला त्याला !

सुनेत्रा: माणसं नुसतीच स्वार्थानं जगत नाहीत -- काही मूल्यंही असतात !

अरविंद: असतात, असतात ! मान्य ! पण बास आता ! ( विठू येतो. त्याच्याकडे पाहून -- ) काय कुणी -- आलंय का ?

विठू: जी --

अरविंद: पेशंट सुरू झाले ! -- ( असे म्हणत दवाखान्याकडे जातो. मागोमाग विठू जातो. सुनेत्रा स्वयंपाकघराकडे जाते. विठू पुन्हा प्रवेशून तिथेच दाराजवळ उभा राहतो. सुनेत्रा, निवडण्यासाठी एका ताटातून तांदूळ आणते, बसते.)

सुनेत्रा: काय रे, काय झालं ?

विठू: तपासताना बगत हुबा ऱ्हाऊ नको म्हनले --

सुनेत्रा: ( हसून --) हं,हं -- मग बस -- ( तो उभाच हे बघून जरा जोरात --) बस ना -- ( तो चटकन जमिनीवर बसतो.) अरे, खुर्चीवर बस -- अं --

विठू: नग --

सुनेत्रा: तू अंगठेबहाद्दर आहेस म्हणे -- शाळेत गेला नाहीस कधी ?

विठू: जी ?

सुनेत्रा: शाळा माहिती आहे का ? लिहायला-वाचायला शिकवतात ती शाळा ?

विठू: जी ?

सुनेत्रा: पाटी, पेन्सिल, वही, पुस्तकं ? -- ( तो नुसता बघत बसलेला. ते पाहून --) बरं, काय, येतं काय तुला ? शेतातलं काम येतं ?

विठू: व्हय --

सुनेत्रा: सिनेमा बघितलायस कधी ?

विठू: जी ?

सुनेत्रा: बरं, तालुक्याचं गाव तरी ? (तो शुंभासारखा बघतोय --) बरं, बाहेरचं कुणी येतं का इकडं ?

विठू: पोस्तमन येतुया -- मालकाकडं बसतुया --

सुनेत्रा: आणखी कुणी ?

विठू: जनावरांचं डाक्तर --

सुनेत्रा: ( गंमतीनं -- ) मानवी हक्क म्हणजे काय ? न्याय म्हणजे काय ?

विठू: ( रडू फुटत --) न्हाई येत मला --

सुनेत्रा: रडू नकोस -- समज मी आता तुला पन्नास रूपये दिले तर काय करशील ? नाही समजत ? पैसे दिले तर ? --

विठू: पैसं ?

सुनेत्रा: मालक पैसे देत नाहीत ? पैसे ? मग तुम्ही कपडे कसे आणता ? खाता कसं ?

विठू: मालक देत्यात जी --

सुनेत्रा: हं -- सगळंच मालकांनी दिल्यावर आणि बाहेर कुठे जायचंच नसल्यावर पैसे करायचे तरी काय म्हणा तुम्हाला !

विठू: व्हय जी --

सुनेत्रा: तू काय वेडा आहेस का ?

विठू: न्हाई जी --

सुनेत्रा: बरं, मग आम्ही तुला जो पगार द्यायचं ठरवलंय दरमहा -- खाऊन पिऊन शंभर रूपये -- त्या पैशांचं काय करणार ?

विठू: मालकान्नी द्येनार जी --

सूनेत्रा: काय ! मालकांना देणार ? तुझे पैसे ?

विठू: व्हय जी --

सुनेत्रा: ( चिडून -- ) ए, तू बाहेर जा तिकडे, चल ! ( तो जायला लागतो, दाराजवळ थबकून उभा राहतो. बाहेरून अरविंद ' विठू S ' अशी हाक मारतो. तो दचकून जवळजवळ पडणारच असतो पण सावरतो आणि बाहेर जातो. काही क्षणांनी अरविंद येतो.) हे, हे -- पगार ठरवणं वगैरे झालं ना ते नाटक होतं सगळं -- विठू त्याचा पगार सुभानरावांकडेच देणार आहे -- हे लोक काय इथं, लहान मुलांसारखी, आपली समजून घालतायत की काय।

अरविंद: काय झालं ? तू नं सध्या एक ठरव -- सारखं चकित होत बसायचं नाही ! हळूहळू इथलं एकूण वातावरण, एकमेकांतले संबंध हे लक्षात येत जाईल -- आणि हे सगळं वेगळंच असणार आहे याची कल्पना आलीय आपल्याला --

सुनेत्रा: कसला पेशंट होता ?

अरविंद: वयस्कर माणूस होता -- अमेबिक डिसेंटरी. इथं, निरुपयोगी झालेल्या म्हाताऱ्या माणसांनाही फुकट पोसलं जातंय हेही लक्षात घे -- ( हे म्हणत अरविंद स्टडीकडे जातो. सुनेत्रा एकटी बसून ... इथे हे दृश्य संपते. पुढचे दृश्य सुरू होते तेव्हा काही दिवस उलटून गेलेले आहेत. संध्याकाळची वेळ. काही क्षणांनी विठू भाजीची पिशवी घेऊन येतो आणि स्वयंपाकघराकडे जातो. ती पिशवी आत ठेवून पुन्हा बाहेर येतो. सुरुवातीपासून, टेपरेकॉर्डरवर चाललेल्या गाण्याचा आवाज. ' सुहानी शाम ढल चुकी ...' हे गाणे. क्षणभरानं टेपरेकॉर्डर हातात घेऊन सुनेत्रा बाहेर येते. तिच्या दुसऱ्या हातात एक पुस्तक आहे. बसते. ऐकत, वाचत राहते.)

सुनेत्रा: विठू S

विठू: ( बाहेरून -- ) जी -- ( येतो.)

सुनेत्रा: भाजी आणलीस ?

विठू: व्हय --

सुनेत्रा: डॉक्टर आले ?

विठू: न्हाई --

सुनेत्रा: मग तिकडे काय करतोयस ?

विठू: काई न्हाई जी --

सुनेत्रा: बस इथे -- गाणं ऐक -- तोपर्यंत मी, बाहेर वाळत टाकलेले कपडे आणते काढून --

विठू: मी आणतो जी --

सुनेत्रा: नको, तू बस इथे --( ती समोरचे दार उघडून बाहेर जाते. विठू उगीच हातापायाचे काहीतरी चाळे करत उभा. अचानक बाहेर सुनेत्रा -- ' विठू S ए विठू S अरे, लौकर ये-- साप...' असे ओरडते. विठू धावत बाहेर जातो. विठू घाईने --' पाय झटका -- उडी मारा --' असे म्हणतो. काही क्षणांनी ' धप् - धप् ' असे आवाज. नंतर हातात मेलेला साप धरलेला विठू डावीकडून उजवीकडे जाताना दिसतो. सुनेत्रा येते. हातातले कपडे तसेच टाकते. घाबरलेली. वेगात श्वासोच्छ्वास. काही क्षणांनी विठू येतो. तोही घाबरलेला पण सुरक्षित -- सुटल्यासारखा. चेहऱ्यावर काळजी.)...बाप रे ! विठू S हात स्वच्छ धू आधी -- तीनदा साबण लावून धू -- नंतर मी तुझ्या हातावर एक औषध टाकते -- त्यानं धू -- मग पुन्हा एकदा साबणानं धू -- आणि मग मला प्यायला पाणी घेऊन ये -- आणखी कुठं नसेल नं साप -- बाप रे -- बरं झालं तू होतास -- आणि तू त्याला हातात धरून, फिरवून, आपटून मारलंस, तुला भीती नाही वाटली ? आमचं सगळं शिक्षण फुकट आहे !

विठू: कुटं चावलंबिवलं न्हाई न्हवं ?

सुनेत्रा: नाही रे बाबा -- वाचले मी -- एकदम माझ्या उजव्या पायाला वेटोळंच घातलं त्यानं ! बाप रे ! गार -- गुळगुळीत ! बरं झालं, तू होतास ! पण कसं काय धाडस करता तुम्ही असं ?

विठू: बरं झालं मी व्हतो, न्हाईतर धडगत नव्हती माजी !

सुनेत्रा: का रे ?

विठू: तुमची दोगांचीबी जिम्मेवारी माजी हाय ! काय बी झालं आसतं त ′ कातडी सोलीन ′ म्हनलेवते मालक ! --

सुनेत्रा: म्हणजे काय केलं असतं त्यांनी ?

विठू: कातडी सोलली आसती न् काय !

सुनेत्रा: खरोखर ?

विठू: त ! आगदी बोलल्यापरमानं ! जरासुदीक फरक न्हाई !

सुनेत्रा: म्हणजे अशी खरोखर सोलली असती कातडी तुझी ?

विठू: म ? म्हाद्या असाच मेल्ता !

सुनेत्रा: म्हणून तू असलं धाडस केलंस !

विठू: काई आनाया येळ तरी हुता का ?

सुनेत्रा: अरे, पण तुला चावला असता तर ?

विठू: हणमंतराव असाच मारतुया साप ! म्या बघिटल्यालं हाय ! म्या आजच मारिला !

सुनेत्रा: बाप रे ! सध्या माझं डोकंच काम करत नाहीय. मी सांगितलं तसं कर जा -- ( पाय झटकते. मग अनाचक लक्षात येऊन --) मलाही पाय धुवायला पाहिजेत -- ( आत जाते. विठू हातापायाचे उगीच चाळे करत उभा. काही क्षणांनी ती बाहेर येते. टावेलनं हातपाय पुसते. मग – ओरडून -- ) अरे जा, हात स्वच्छ धू आधी -- वेडपटासारखा उभा राहू नकोस --

विठू: ( झटकन् --) जी -- ( आत जातो. सुनेत्रा भरकटल्यासारखी एकटक बसून. काही क्षण. नंतर दवाखान्याच्या दारातून अरविंद येतो.)

अरविंद: शेजारच्या वस्तीवर -- ( त्याच्या आवाजाने सुनेत्रा दचकते.) -- काय झालं ? दचकलीस का अशी ?

सुनेत्रा: काही नाही -- अक्षरश: वाचले मी आज काही मिनिटांपूर्वी !

अरविंद: म्हणजे ? काय झालं ?

सुनेत्रा: साप ! साप होता ! मोठ्ठा । बाप रे !

अरविंद: कुठं ?

सुनेत्रा: कुठंबिठं नाही -- माझ्या उजव्या पायाला वेटोळंच घातलं होतं त्यानं -- तिथं बाहेर --

अरविंद: मग ?

सुनेत्रा: लगेच ओरडून बिठूला बोलावलं मी -- त्यानं हातानं गरगर फिरवून, आपटून मारला तो साप ! दहाबारा फूट तरी असेल ! अजून, आत्ता तुला सांगतानासुध्दा काटा येतोय अंगावर ! आपल्या कुंपणाच्या बाहेर -- लांब टाकलाय त्यानं -- तिकडे -- बघून ये -- ( तो समोरच्या दारातून बाहेर उजव्या हाताला जातो. मागोमाग ती जाते आणि दारात थांबते. मधेच आजूबाजूला बघते. काही क्षणांनी तो येतो. दोघेही आत येतात. ती दार लावून घेते. पुढे येत --) मला तरी इथं राहणं जमणार नाही बाबा -- सारखं सापाच्या शंकेनं भिऊन भिऊन खंगून मरून जाईन मी इथं. आपण झोपलेले असताना एखादा आला घरात म्हणजे ! बघितलास नं केवढा होता तो !

अरविंद: विठूनं हातात घेऊन मारला ?

सुनेत्रा: हो.

अरविंद: कुठाय तो ?

सुनेत्रा: हात धुतोय. ( विठू येतो.)

विठू: औषध कंचं टाकू हातावर ?

सुनेत्रा: ती बाथरूमच्या फळीवर बाटली आहे, त्यातलं टाक. ( तो जातो.) तुला भीती नाही वाटत सापाची ?

अरविंद: वाटते. पण इथं जगायचं ठरवल्यावर यातले साप तेवढे वगळून द्या असं म्हणताच येणार नाही. सावधपणा ठेवायचा पण समोर, आजूबाजूला साप नसताना सापाच्या भीतीत सारखं राह्यचं नाही -- असंच करावं लागेल. नाहीतर सापाच्या विषापेक्षा भीतीच्या विषानंच मरेल माणूस. आणि आपण निर्णय घेतलेला आहे. आता पळापळ करायची नाही. ॲडजस्ट व्हायला जरा वेळ लागेल इतकंच.

सुनेत्रा: बघायला पाहिजे. मला तर आता जरा आवाज झाला की सापच आला असं वाटेल -- रात्री झोपही लागणं अवघड वाटतंय मला आता --

अरविंद: हे अटळ समजून ॲडजस्टच व्हायचं !

सुनेत्रा: आणि दुसरं -- हा विठू आपल्याकडे नको -- ( विठू येतो.)

अरविंद: का ?

सुनेत्रा: ( विठूला --) तू बाहेर थांब -- ( तो जातो.) मला वाटलं होतं, आपल्या आपुलकीपायी कसलं धाडस करून बसला हा, पण तसं नाहीय ते -- मुख्य कारण वेगळंच आहे --

अरविंद: काय ?

सुनेत्रा: सुभानरावांनी आपली जबाबदारी त्याच्यावर टाकलीय आणि यात काहीही कसूर झाली तर कातडी सोलून ठार करायची धमकी दिलीय त्यांनी त्याला. पूर्वी एक माणूस त्यांनी असा मारलेला आहे !

अरविंद: हॉरिबल ! ते आपण डायरेक्ट बोलू त्यांच्याशी ! पण आपल्याला खटकणाऱ्या इथल्या गोष्टी ताबडतोब फटाफट बदलता येतील असं मला वाटत नाही. वेळकाळ पाहून प्रयत्न करता येईल.

सुनेत्रा: चुकीच्या गोष्टीला ताबडतोबच प्रतिकार केला पाहिजे. मी समजतेय माझ्याबद्दलची आपुलकी आणि ती आहे धमकीची भीती !

अरविंद: आपल्याला लोक आदर्शवादी समजतातच ना तशी तू ही आपुलकीच धरून चाल ! आणि मला वाटतं या गोष्टींना प्रतिक्रिया देण्याची घाई नको. अशा धमकीच्या भीतीपोटी सतत आपली काळजी घेणारा माणूस आपल्याबरोबर असणं मलाही विकृतच वाटतं, पण त्यामुळं आपल्यालाच इथून निघून जावं लागेल अशा स्टेप्स घेणंही बरोबर नाही. माणसं आधी आपलं ऐकायच्या मन:स्थितीत येऊ देत, मग बोलू.

सुनेत्रा: मला हे तुझं पटत नाही. यांना असं सतत भीतीच्या दडपणाखाली ठेवणं हा अन्याय आहे.

अरविंद: हा अन्याय केला नाही तर ही माणसं हळूहळू स्वतंत्र व्हायच्या मार्गाला लागतील !

सुनेत्रा: मग ?

अरविंद: तुला यात काहीच गमवायचं नाहीय ! पण सुभानरावांना असं होणं कसं चालेल ? आणि तू असलं बोलत राहणं म्हणजे निष्कारणच सुभानरावांचं शत्रुत्व पत्करणं होईल ते. आपल्यालाच इथून पळवून लावणारे विचार आहेत हे !

सुनेत्रा: मग तुझं काय म्हणणं -- डोळेझाक करायची ?

अरविंद: सध्या, दोन्ही चुकीचं आहे असं धरून चालू. पण एक लक्षात घे -- विठूकडून आपल्याला हे धमकी प्रकरण कळलंय असं जरी सुभानरावांना कळलं --

सुनेत्रा: -- हं -- ते आहेच म्हणा !

अरविंद: आणि हेसुध्दा काय, तो भीतीपोटी वागलाय हे तुला कळलंय म्हणून ! पण समज ही भीतीही नसती आणि तुला वाटतंय तशा उत्स्फूर्तपणातूनही ती कृती त्याच्याकडून नसती घडली तर ?

सुनेत्रा: जगायच्या पध्दती चांगल्या असतील तर योग्य वागणं आपोआप होईल असं मला वाटतं.

अरविंद: कल्पना अधिक विश्वास भागिले वस्तुस्थिती !

सूनेत्रा: आपण निष्कारणच इथे येऊन पडलोय असं आता मला वाटायला लागलंय -- ( इथे हे दृश्य संपते. पुढचे दृश्य सुरू होते तेव्हा दुसऱ्या दिवसाची दुपार. विठू एकटा समोर बसलेला. काही क्षणांनी सुभानरावांच्या आवाजात ' विठ्या S ' ही हाक ऐकू येते. विठू दवाखान्याच्या दिशेने पळतो. मग विठू आणि सुभानराव येतात.)

सुभानराव: कुटं गेले ?

विठू: रंगी बाळत हुतीया तिकडं बाई गेल्यात आन् डाक्तरसाब हैत हिकडं मागं -- झाडांस्नी पानी घालत्यात --

सुभानराव: तुला पानी घालता येत न्हवतं का रे भडव्या ? आँ ?

विठू: नगो म्हनले -- त्येच नगो म्हनले --

सुभानराव: कामं नीट करायची -- हां -- आन् तू काय साप मारलास काय मर्दा --

विठू: व्हय जी --

सुभानराव: चांगलं क्येलं -- त्यांस्नी काय झालं तर -- हाय न्हवं ध्येनात --

विठू: व्हय जी --

सुभानराव: बरं सांग जा त्यांस्नी -- म्या आलोय म्हून --

विठू: सांगतो की -- ( जातो. काही क्षणांनी विठू आणि अरविंद येतात.)

अरविंद: नमस्कार सुभानराव, बसा.

सुभानराव: मला कळलं त्ये सापाचं मग लगीच सकाळी गुळाची ढ्येप दिली बक्षीस या विट्याच्या घरी धाडून -- ( विठूला -- ) तू जा भाईर येड्या -- ऐकत हुबारतोस काय ! -- ( विठू जातो.) चांगल्याला आपुन लग्याच बक्षिसी द्येतो ! हां ! पन खरं सांगू काय -- ह्ये भडवे लाथा आन शिव्यांच्याच लायकीचं हैत ! आळशी ! कामचोर ! घाबरीवलं तरच कामं करत्यात भोसडीचे ! काम नगं आसलं की आजारी पडल्याचं सोंग करत्यात ! येक असाच हुता -- सदा म्हनून. न्हाई आला येक दिशी कामावर -- आजारी हाय म्हून सांगावा धाडलान् ! दिली आर्डर मग आमच्या सैन्याला ! बडवत आना म्हनलं आन् डब्बल काम कराया लावा म्हनलं ! आमची मानसं बी येडी हाईत ! त्ये खरंच आजारी हुतं, ह्ये काय त्येंनी बघिटलं न्हाई आन् आर्डरपरमानं क्येलं समदं ! म्येलं की वो त्ये । आता काय करावं ! म्हनलं जाऊ द्या आता -- गाडा थितंच र्‍येतात ! तसं क्येलं समदं ! पन कुटनं काय बातमी फुटली काय अजूनबी न्हाय कळलं -- पोलीस आले. खणून पाह्यलं ! हाडं गावली की हो त्या सद्याची ! ह्ये समदं प्रकरान ग्येलं जिल्ह्याच्या डाक्तरकडं ! त्येची फी दिली, दुखलंखुपलं बघिटलं आन् मग त्येनं दिला रिपोट की ती हाडं बैलाची व्हती म्हून ! ही मानसं कशी हरामी असत्यात ह्ये त्येला बी ठावं व्हतं. येळ आली त करावं लागतं ! पन् तसं म्हनाल तर पूर्न येवस्था ठीवतो म्या त्येंची ! त्यानला काय घोरच नाय ! घर द्येतो, कपडे द्येतो, औषधंबी द्येतो -- समदं बगतो ! त्ये बी आमास्नी द्येव मानत्यात ! आजचं न्हाई ह्ये ! पिढ्यान् पिढ्यांचं हाय ह्ये !

अरविंद: आणि यांच्या मुलांचं शिक्षण ?

सुभानराव: कसलं शिक्षान ? शिकत न्हाईत ह्ये ! बधीर डोक्याचे असत्यात साले ! आन् काय करायचं शिक्षान ? आमच्या छत्राखाली मस्त ऱ्हात्यात ह्ये ! यांचे म्हातारेकोत्तारे आईबाप, ल्हान पोरं -- समदी जिम्मेवारी आमची ! आता येक हाय -- यांस्नी शिकवून शाने करावं -- अतिशाने करावं आन आपलेच उद्योग बंद पाडून आपल्याच पायावं धोंडा हानावा आन फुडं सहकुटुंब देशोधडीला लागावं आसा काही परयेत्न आम्ही करीत न्हाई ! का करावा ? आन् हाय त्ये काय वाईट हाय ? मस्त जगत्यात की ! ( इथे सुनेत्रा येते.)

सुनेत्रा: नमस्कार.

सुभानराव: नमस्कार !( सुनेत्रा बसते.) तुम्ही शिकल्याली मानसं ! तुमास्नी वाटनार !

अरविंद: वाटणार म्हणजे विचित्र वाटतं हे सगळं आम्हाला !

सुभानराव: वाटनार ! तुमचं चुकीचं बी न्हाई ! चुकीचं न्हाई ! पन हितं ऱ्हा, हितली लोकं बघा -- लई येगयेगळी मानसं असत्यात ! निसतं इचार करू नगासा !

अरविंद: जगण्याचे वेगवेगळे प्रकार तर असणारच म्हणा -- पण त्यातल्या त्यात सुखावह काय होईल हे बघायचं --

सुभानराव: लई म्हत्त्वाचं हाय त्ये ! त्ये पायजेच ! व्हनार काय पन ? आमी न्हाई त आमच्या जागी दुसरा कुनी यईल -- अजून काय ! पन हूंद्या व्हईल तवा !( उठत--) त्ये सापाचं कळलं, म्हनलं इचारपूस करावी. येखंड जाळा घरात, काय भिऊ नगा ! साप चावून कितीक लोक मरत्यात हितं ? कंदीतरी यकांदा ! तसं काय न्हाई. सावध ऱ्हा म्हंजे झालं ! हा विठ्या कुटं गेला ? विठ्या S ( विठू येतो.) नीट लक्ष ठीव भडव्या -- न्हाईतर --

विठू: जी --

सुभानराव: हं ! अच्छा, चलतो मी ! जरा गडबडीत हाय -- नमस्कार !

अरविंद,सुनेत्रा: नमस्कार ! ( सुभानराव जातात. मागोमाग विठू बाहेर जातो.)

सुनेत्रा: काय म्हणत होते ?

अरविंद: त्यांचं म्हणणं यांना मिळतंय तेच जीवन योग्य आहे आणि त्यांची सगळी काळजी घेतली जातीय. या माणसांच्यात सुधारणा घडवून मी -- म्हणजे ते -- माझं नुकसान का करून घेऊ असा त्यांचा प्रश्न आहे. आणि इथले हे लोक त्यांना देव मानतात ! देव !

सुनेत्रा: तुला काय वाटतं आपल्याला असं त्रयस्थासारखं बेफिकीर राहता येईल ? ( अरविंद सिगरेट काढून तोंडात धरतो. लाइटरने शिलगावतो. झुरका ओढतो...)

अरविंद: ( धूर बाहेर टाकत --) राहावं लागेल ! दुसरं काही करायला गेलं की आपली उचलबांगडी !

सुनेत्रा: आले. कॉफी आणते करून. ( ती आत जाते. अरविंद पुन्हा एक झुरका ओढतो -- धूर सोडतो. क्षणभराने विठू येतो. )

विठू : काय काम हाय का ?

अरविंद: काही नाही. बस इथं. आपण आता कॉफी घ्यायचीय.

विठू: नग --

अरविंद: गप -- बस -- ( तो बसतो.) सांगू काय सुभानरावांना की घे म्हटलं तरी हा कॉफी घेत नाही म्हणून ? सांगू ?

विठू:		नग जी -- घ्येतो --

अरविंद:		कसं वाटतं तुला इथं काम करायला ?

विठू:		माजा लई मान वाडला -- घरी, बाजूला -- हितं तुमच्याकडं हाय म्हून !--

अरविंद:		वय किती तुझं ? वीसपर्यंत ?

विठू:		आसल -- ( सुनेत्रा ट्रेमधून कॉफी घेऊन येते. विठू उठून वाटतो.)

अरविंद:		तू घे एक -- हं -- बस. वीस म्हणजे किती कळतं का ?

विठू:		न्हाई --

अरविंद:		मग आता लग्नबिग्न कधी करणार ?

विठू :		ठरविलंय मालकांनी -- म्हैन्यानंतर व्हईल म्हंत्यात --

सुनेत्रा:		तुमचं तुम्ही नाही ठरवत ?

विठू :		न्हाई --

सुनेत्रा:		मुलगी कुठली आहे ?

विठू :		हितलीच -- वस्तीवरचीच हाय --

अरविंद:		अरे वा, बरंय मग ! मग फावल्या वेळात डोक्यात तिचाच विचार असेल ! आं ! भेटतोस की नाही तिला मधनंमधनं ?

विठू:		न्हाई !

सुनेत्रा:		( अरविंदला -- ) ए, काही तरी काय विचारतोस !

अरविंद:		अजून कधीही बोललेला नाहीस तू तिच्याशी ?

विठू:		न्हाई जी--

अरविंद:		म्हणजे मग लग्न झाल्यावर पहिल्या रात्रीच भेट होणार तिची -- अं --

सुनेत्रा:		ए, नको रे चेष्टा --

विठू:		न्हाई जी --

अरविंद:		काहीही विचारलं की ' न्हाई जी '! पहिल्या रात्री तुमची दोघांची भेट नाही होणार ?

विठू:		न्हाय जी -- पयली रात मालकाकडं आसती --

अरविंद:		काय !

विठू:		द्येवाचा न्येवेद असतुय त्यो -- मग ती आमची --

अरविंद:		काय म्हणतोयस काय ? असं असतं इथं ? सगळ्यांचं असंच होतं ?

विठू:		व्हय--

अरविंद:		आणि तुम्ही --

सुनेत्रा: शी ! कसलं जगणं हे !

विठू: लई जुनी परता हाय ही --

अरविंद: हॉरिबल ! ( सुनेत्रा थक्क --)

विठू: जी ?

अरविंद: काही नाही... पण... काही नाही...

सुनेत्रा फारच क्रूर सगळं ! शी ! ( विठू कपबशा ट्रेमध्ये ठेवून ट्रे आत घेऊन जातो. मग येऊन बाहेर जातो. ) ए, हे सगळं नुसतं बघत राह्यचं आपण ?

अरविंद: च्यायला ! माणसांना घट्ट आपल्या पकडीत ठेवायचं म्हणजे किती ! प्रत्येक वधूची पहिली रात्र !

सुनेत्रा: आणि यांना त्याची काहीच खेदखंतही नाही ! अजब आहे सगळं !

अरविंद: यांना पर्यायच नाही दुसरा ! कुठल्याही गोष्टीला विरोध केला -- डोकं वर काढलं की मृत्यू ! आणि पिढ्यान् पिढ्या हेच हॅमर केलंय यांच्या डोक्यांवर ! त्यामुळं त्यांना यात चुकीचं -- अन्यायाचं असं काही वाटतच नाही ! हेच नॉर्मल वाटतं त्यांना ! जगणं म्हणजे हे असंच !

सुनेत्रा: आपला रोल काय राहणार या सगळ्या प्रकारात ?

अरविंद: आपल्या शहरातल्या प्रॉब्लेम्समुळं आपण इकडे आलो ! यात पडायचं जाऊ दे, नुसतं बोललं तरी राहणं अशक्य होईल इथं ! बरं, तसं पाहिलं तर हे सगळं सांगताना विठू तर नॉर्मल होता -- त्याला यात अन्याय असा काहीच वाटत नाही --

सुनेत्रा: पण अन्याय आहे की नाही हा ? आपल्याला काय वाटतंय ?

अरविंद: अन्याय आहेच ! पण या मानवदेही देवाला खुश करणं महत्त्वाचं आहे असं यांना सगळ्यांनाच वाटतंय ! कुणालाच काहीच खटकत नाही. उलट यांना असं करून कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळत असेल ! आणि पुढच्या आयुष्याची सुरक्षितता ! आपल्याला काय वाटतंय याला अर्थच काय आहे ? आपण कोण ?

सुनेत्रा: अन्यायग्रस्त लोकांमध्ये जागृती ही जाणीवपूर्वकच आणावी लागेल ! त्यांना कळत नसेल तर ते समजावून द्यावं लागेल ! माणसातले त्यातल्या त्यात प्रगत असे जे गट असतील त्यांच्या न्यायाच्या कल्पना बरोबर धराव्या लागतील.

अरविंद: तसं तर कितीतरी ठिकाणी अन्याय वाटत असून आपण गप्प राहतो. आपण स्वत:ही अन्यायग्रस्तच आहोत ! शहरात राहू शकलेले सगळे डॉक्टर्स आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत असं काही नाही. आणि कायद्याच्या न्यायाचं म्हणावं तर तिथंही न्यायाधीशाचं मन सांभाळण्याचं महत्त्व असतं !

सुनेत्रा: पण न्याय आणि अन्याय या शब्दांना अर्थ आहेतच ना काहीतरी ! एकटा कोण जगू शकतो ? अं ? एकमेकांचा विचार करणं म्हणजेच न्याय !

अरविंद: जाऊ दे ते सगळं ! आपल्या परिस्थितीमुळं आपण काही अन्याय सहन करतो आणि त्यांच्या परिस्थितीमुळं ते काही अन्याय सहन करतात ! आणि हे सगळ्यांना समजतं ! अन्याय दिसला की चवताळणं, धावून जाणं हे जर खरं असतं ना तर सगळीकडं सारखी धावत चाललेलीच माणसं दिसली असती ! न्याय म्हणजे काय याला संपूर्ण मानवजातीचं एकच उत्तर येऊ शकेल का ? असं व्हायला -- माणसं वेगवेगळी असली तरी त्यांचं मन एकच असावं लागेल ! पण मग अन्यायाचा प्रश्नच येणार नाही.

सुनेत्रा: ते काहीच नाही माझं म्हणणं -- आपल्याला जो अन्याय वाटतो तिथं आपली भूमिका काय ? -- एवढाच प्रश्न आहे.

अरविंद: आपण आपल्यावर होणारे अन्याय का सहन करतो या प्रश्नाचं जे उत्तर असेल त्यातच तुझ्याही प्रश्नाचं उत्तर सापडेल. आपल्या मनाच्या -- स्वभावाच्या बाहेर असं कोण काय करू शकतं ?

सुनेत्रा: आपली काहीच जबाबदारी नाही ?

अरविंद: माझे फायदेतोटे मला जसे समजतील तसं मी वागणार. ( इथे विठू स्वयंपाकघरातून येतो आणि दवाखान्याकडे बाहेर जातो.)

सुनेत्रा: मग मी तुला एक अपराधी समजेन !

अरविंद: आणि तू असं करणं हा मी माझ्यावरचा एक अन्याय समजणार !

सुनेत्रा: सगळंच बरोबर -- असं कसं असू शकेल ? मला वाटतं आपण तिला इथं बोलावून घेऊ. म्हणजे विठूच्या होणाऱ्या बायकोला. तिच्याशी बोलू.

अरविंद: कशाला ? काहीही फरक पडत नाही.

सुनेत्रा: हं. ( काही क्षण शांतता.) पण मला उत्सुकता आहे.

अरविंद: हे इन्व्हॉल्व्ह होणं ठरेल ! गुंता होईल !

सुनेत्रा: पण बघू या --

अरविंद: बघू या, तर बघू या !

सुनेत्रा: विठू S , ए, विठू S ...

विठू: ( बाहेरून --) जी, आलो -- ( येतो -- )… जी ?

सुनेत्रा: तू तर तिला भेटत नाहीस, नाही का ? असू दे. पण तिला आमचा एक निरोप द्यायचा असला तर ?

विठू: तुमचं काम तं करावं लागंल --

सुनेत्रा: आम्हाला तिला बघायचंय म्हणून आम्ही तिला बोलावलंय म्हणून सांगशील ?

विठू: जी --

सुनेत्रा: येईल ना ती ?

विठू :		यील --

सुनेत्रा:		जा मग --

विठू:		जी -- ( जातो.)

सुनेत्रा:		घाबरतोयस तू ?

अरविंद :		कशाला ?

सुनेत्रा:		या फंदात पडायला ?

अरविंद:		अजून तसा कुठे काय प्रश्न येतोय ? आपली इतपत उत्सुकता समजून घेतली जाईल.

सुनेत्रा:		म्हणजे या पध्दतीनं आहे तुझं ?

अरविंद:		कुणीही स्वत:ला फार हुशार समजू नये -- कुणीही कधीही कोलमडून पडू शकतं --

सुनेत्रा:		म्हणजे मी ?

अरविंद:		तूही किंवा मीही !

सुनेत्रा:		हे जरी असलं तरी, बरोबर काय हे आपल्याला कळेल हा विश्वास हवाच.

अरविंद:		पण नुसती उत्सुकता एवढंच हे ठीक आहे, असं मला वाटतं. आपण कुणीतरी दुसऱ्यांचं भलं करणारे आहोत, असं वारं आपल्या डोक्यात नसावं !

सुनेत्रा:		आधीच काहीही ठरवून ठेवायची आवश्यकता नाही.

अरविंद:		याचा अर्थ असा की ती दिसते कशी, बोलते कशी यावर आपलं सहानुभूतीचं प्रमाण ठरेल !

सुनेत्रा		बघू -- ( इथे हे दृश्य संपते. पुढचे दृश्य सुरू होते तेव्हा अरविंद वाचत बसलेला आणि सुनेत्रा टेपरेकॉर्डरवर गाणे ऐकत बसलेली --' दिल है के मानता नही ' -- हे गाणे. काही क्षणांनी विठू येतो. सुनेत्रा टेप बंद करते.)

सुनेत्रा:		हं, काय झालं ?

विठू:		शेतावं हुती -- सांगावा दिला -- मालकास्नी सांगून येत्ये म्हनली --

सुनेत्रा:		किती वेळ लागेल ?

विठू:		लगीच यील --

अरविंद:		ठीक आहे, तू बाहेर थांब -- ( तो जायला लागतो, लगेच परत येतो.)

विठू:		आली --

सुनेत्रा:		पाठव तिला आत आणि तू बाहेरच थांब --

विठू:		जी -- ( जातो. )

अरविंद:		म्हणजे आपण तिला बोलावल्याचं गेलंही लगेच सुभानरावांपर्यंत !

सुनेत्रा:		हं -- ( ती मुलगी म्हणजे लच्छी -- सुमारे १६ -- येते. आकर्षक. दारातच उभी राहते.)

हं -- ये -- ( ती थोडी पुढे येते. ) बस -- बस नं तिथे खुर्चीवर -- बस, बस --

लच्छी: न्हाई जी -- ( अरविंद पुस्तक मिटवून ठेवतो.)

सुनेत्रा: बरं, नाव काय तुझं ?

लच्छी: लच्छी --

सुनेत्रा: म्हणजे -- लक्ष्मीचं लच्छी झालं का ?

लच्छी: व्हय -- कशापायी बोलीवलं ?

सुनेत्रा: काही नाही, विठूची होणारी बायको आम्हाला बघायची होती.

अरविंद: एक उत्सुकता वाटली -- एवढंच !

सुनेत्रा: विठूची ओळख आहे का तुझी ?

लच्छी: निस्ती वळक -- बोलल्यालं चालत न्हाई हितं -- मालकास्नी राग येतो --

सुनेत्रा: तुझं विठूशी लग्न मालकांनीच ठरवलं ?

लच्छी: तसंच हाय समद्यांचं --

अरविंद: मग तुला कधी सांगितलं ते ?

लच्छी: म्हयना झाला आसल --

अरविंद: मग लगेच का नाही केलं लग्न ?

लच्छी: म्हूरत बगत्यात मालक --

सुनेत्रा: छान आहेस तू ! -- आमच्या विठूला अगदी सुयोग्य ! छान वाटलं ! ( ती काही बोलत नाही.)

अरविंद: आमचा निरोप सांगताना विठू बोलला ना तुझ्याशी ?

लच्छी: न्हाई -- मुकादमसायबाकडनं सांगिटलं --

अरविंद: हात्तिच्या !--

सुनेत्रा : मग नवे कपडे बिपडे शिवणार नं ?

लच्छी : समदं मालक घेत्याल -- जेवनबी आसतंय समद्यास्नी --

अरविंद: मग काम बंद त्या दिवशी ?

लच्छी: व्हय --

अरविंद: दारू असते का दारू ?

लच्छी: न्हाई -- यरवी कंदीतरी घेत्यात मालक -- तंबाकू, बिड्या दररोज मिळत्यात --

अरविंद: बायकांना पण ?

लच्छी: व्हय -- पर पयलं मूल झाल्याबिगर न्हाई --

अरविंद: आणि पुरुषांना -- म्हणजे बाप्ये लोकांना ?

लच्छी:	त्यांस्नी तसं काय न्हाई --

सुनेत्रा:	अरे, मग विठूचं बुडतंय हे सगळं -- त्याला विचारलं पाहिजे --

अरविंद:	विठू ओढतो का बिड्या ? तंबाखू खातो ? ( ती काही बोलत नाही. खाली बघत उभी राहते.) मग लग्नानंतर तू विठूच्या घरी जाणार तर ? का तो येणार तुमच्या घरी ?

लच्छी:	न्हाई -- म्या --

सुनेत्रा:	स्वयंपाक करतेस का तू ? आम्ही येऊ का एकदा जेवायला तुमच्याकडे ?

लक्ष्छी:	म्या बनीवत्ये पर तुमच्या लायकीचं न्हाई --

अरविंद:	चालेल आम्हाला -- मग --

लच्छी:	आनून दीन हितं --

सुनेत्रा:	का, घरी नको येऊ ?

लच्छी:	झोपडी हाय -- छोटी हाय --

अरविंद:	घरी कोणकोण असतं ?

लच्छी:	आय आन् म्या --

अरविंद:	आणि वडील ?

लच्छी:	न्हाई -- म्येलं त्ये --

सुनेत्रा:	अरेरे -- कसे ग वारले ते ?

अरविंद:	लौकर वारले म्हणजे !

लच्छी	आजारी हुतं -- मालकास्नी वाटलं ढ्वांग हाय -- त्यांनी मारिवला -- थितंच पुरला त्येला श्येतात -- मग त्येची हाडं बैलाची हुती असा रिपोट आला --

अरविंद:	काय नाव काय होतं ?

लच्छी:	सदा --

अरविंद:	अच्छा ! तोच म्हणजे ! सदा ! त्याची मुलगी होय तू ! अच्छा !

लच्छी:	जाऊ ?

अरविंद:	हं, जा, जा !

सुनेत्रा:	ये पण मधनंमधनं भेटायला -- खूप आवडलीस तू आम्हाला --

लच्छी:	जी -- ( जाते. काही क्षण शांतता.)

अरविंद:	हॉरिबल आहे सगळं !

सुनेत्रा:	म्हणजे वडिलांच्या खुन्याबरोबर पहिली रात्र ! आणि हे आपल्या समोर घडणार ! आपल्या समोर ! ... ( दोघे एकमेकांकडे पाहात राहतात... पडदा पडत जातो ...)

**---- अंक पहिला समाप्त ---**

.

**-- अंक दुसरा --**

पडदा उघडतो तेव्हा विठू दोन हातात दोन भरलेल्या बादल्या घेऊन समोरून येतो आणि स्वयंपाकघराकडे जातो. आत बादल्या ठेवून येतो आणि हात पुसत दवाखान्याच्या दारातून बाहेर जातो. सकाळची वेळ. अरविंद अंघोळ झालेला डाव्या बाजूने येतो. आरशात पाहून भांग पाडतो. उजव्या बाजूने दवाखान्याच्या दारातून सुनेत्रा येते. टावेलने हात पुसते आहे.

सुनेत्रा: सरळसरळ मलेरिया आहे आणि हे लोक गंडेदोरे करतायत ! यांच्यातलाच एकजण असे दोरे मंत्रून देतो !

अरविंद: हां, हे जरा आपण सुधारणा करायला हरकत नाही असं क्षेत्र आहे.

सुनेत्रा: आत्ता मी एक पेशंट तपासत असताना लच्छी आली होती बाहेर. उभी होती थोडा वेळ. माझं काम झाल्यावर बघितलं तर ती गेलेली होती.

अरविंद: तिला काहीतरी बोलायचं असेल आपल्याशी. नाहीतर आली असेल औषधासाठी --

सुनेत्रा: पुन्हा येईल मग ती. एकदोन दिवसात नाही आली तर बोलावून घेऊ पुन्हा एकदा. ( विठू येतो.)

विठू: मालक आल्येत --

अरविंद: ( उठून -- ) बोलाव नं त्यांना -- आत या म्हणावं -- ( विठू जातो. काही क्षणांनी दवाखान्याच्या दारातून विठू आणि सुभानराव येतात. विठू पुन्हा बाहेर जातो.)

सुभानराव: नमस्कार,नमस्कार.

अरविंद/सुनेत्रा: नमस्कार.

सुभानराव: काय कसं काय चाललंय ?

अरविंद: झालीय सुरुवात हळूहळू. तुम्ही लोकांना सांगून ठेवलेलं असल्यानं बरं झालंय. तुमची हरकत नसेल तर वस्तीवरच्या सगळ्यांचीच एकदा तपासणी करून घ्यावी असं मला वाटतं.

सुभानराव: आमची कसली हरकत हो ? खुशाल करा. आजूबाजूला आपल्यासारख्याच चारपाच वस्त्या हैत -- त्यांस्नी बी सांगून ठिवलंय -- तुमी हितं आल्यामुळं समद्यांचीच सोय व्हनार हाय. नीट समदं हुईस्तोवर आमी समद्ये मिळून तुमास्नी म्हैना तीन हजार तरी चालू करनार हाय. तुमचाबी खर्च हाय, जानंयेनं

हाय, औषधं-विंजक्षनं हाईत तर त्यासाटी ॲडव्हान्सबी द्यावं आसं आमी ठरीवल्यालं हाय, न्हाई म्हनू नगा. वेव्हार हाय ह्यो. तुमचीबी गैरसोय व्हाया नगं. ह्ये घ्या. येक हजार हैत. ( खिशातून काढून देतात.) अजून काय लागलं तं सांगा.

अरविंद: ( घेऊन खिशात ठेवत -- ) हं, ठीक आहे. तुम्ही म्हणताय तेही बरोबरच आहे. आमच्या तशा फार गरजा राहणार नाहीत. बघू.

सुभानराव: आमी बी कुटं कमी पडू ने ह्येच आमी बगनार. दोनतीन मोटरसायकलीबी पडून असत्यात आपल्याकडं -- लागली तं घ्या -- लागंल --

अरविंद: आभारी आहे. तुमच्या या आपुलकीमुळं, मला वाटतं, आम्हाला कसलीच अडचण येणार नाही.

सुनेत्रा: चहा करते.

सुभानराव: अवो ऱ्हाऊं द्या -- बसा ! लई चा झालाय सकाळधरनं --

अरविंद: थोडाथोडा पण नको ?

सुभानराव: चासाठी पुन्ना यीन पेशल -- मंग झालं ? बसा. ( क्षणभरानं --) विट्याची व्हनारी बायकू आल्ती म्हनं हितं ! योजना आमचीच बरं का ! कशी वाटली तुमान्ली ? जोडा बरोबर हुईल न्हवं ?

अरविंद: छान आहे. बुजरी आहे जरा.

सुभानराव: हितं समदे बुजरेच गावनार तुमाला. शेरावानी मग्रुरी हितं न्हाई ! सादीभोळी हाय बिचारी ! आमच्याकडं सदा म्हनून येक मजूर व्हता त्याची ही मुलगी. चांगली हाय. आता तिचा बाप आमच्या मानसांकडून -- म्हंजे घटकाभर आमच्याकडूनच म्हनाना का -- मारला ग्येला याचं आमालाबी वाईट वाटलं. चूकच झाली ती आमची. पन झाली. आता त्याच्यातच आडकून बसावं का ? यवडा मोटा पसारा हाय ! तसं कसं चालंल ? त्येच येक दुख धरून कसं बसनार ? लोकं बी शानी हैत बिचारी ! त्यांन्ली बी कळतं ! काय बी किल्मीश न्हाई कुनाच्या मनात ! द्येव मानीत्यात आमान्ली ह्ये ! द्येव ! आजचं न्हवं -- पिढ्यानपिढ्या ! आता द्येव रक्षान बी करतो, काळजी बी घ्येतो, पर कंदीकंदी द्येवाचा कोपबी हुनारच की ! व्हतो का न्हाई ? त्यवडं तं चालनारच !

सुनेत्रा: तुम्हाला राग येणार नसेल तर एक विचारू का ?

सुभानराव: इच्यारा हो !

सुनेत्रा: हे तुम्हाला देव मानतात की घाबरतात ?

सुभानराव: (मोठ्यानं हसून --) घाबरल्याबिगर कुटला द्येव हो ? आता आमी तुमचा आदर करतो, अदबीनं वागतो म्हनतानं तुमचा कसला ह्यो पाइंट ?

अरविंद: नाही, तसं नाही, शहरात जरा मोकळेपणानं बोलायची सवय असते आम्हाला. त्यात कुणाला दुखवायचा हेतू नसतो.

सुभानराव: आमी बी वावरतो च्यार मानसात ! इचार इनाकारनच टोकदार नसावा ! येकम्येकांस्नी धरून प्रगती साधावी ! तर असूं द्या ! आता तुमास्नी येक सांगतो, कळलंबी आसंल तुमास्नी, न्हाईतर कळंल. हितं कुनाचं बी लगीन झालं की पयल्या रातीला नववधू आमच्याकडं येती. मग संसार करती ! आजचं न्हवं ! पिढ्यान् पिढ्या चाललंय ह्ये ! आदी आमास्नी नैवेद आसतो ! आता तुमास्नी ह्ये चुकीचं बी वाटंल ! पर परता हाय ही ! आता ह्येच्यातबी येक सांगन्यासारकं हाय ! आमच्या वस्तीतली कुटलीबी मुलगी लगीन हुईस्तोवर कुमारीच आसती. तिला आमीबी हात लावीत न्हाई आन् कुनाला तशी हिंमतबी करू ग्येत न्हाई ! अशी नीतीमत्ता बी हाय ! पर तुमास्नी ह्ये समदं चुकीचंबी वाटू शकतं !

सुनेत्रा: हो, आम्हाला चुकीचंच वाटंत हे !

सुभानराव: ( हसून -- ) यकदा येक समाजकार्यकर्ता आल्ता हितं. यस्टीतनं उतरला न् आला. बातमी लागली. हितल्या लोकांच्या घरात जाऊन मुलाकती घ्याया लागला. पयल्या घरात काय झालं त्ये आमास्नी कळलं. तिसऱ्या घरात लाथाबुक्क्यांनी तुडीवला लोकांनी त्येला ! समद्यांना त्येच्या इचारासारकं कराया बगत व्हता ! कार्यकर्ता !

सुनेत्रा: पण वेगवेगळे विचार तर असणारच नं !

सुभानराव: ( हसून --) जाऊं द्या ! इचारइनीमयाची फारशी आदत न्हाई आमास्नी ! आमचा तुमास्नी उपेग व्हईल यवडं बगा ! इचारइनीमय नगं ! चलू का ? च्या प्यायला यीन पुन्ना पेशल। शबूद आपला ! नमस्कार !
( उठतात. ते दोघेही नमस्कार करतात. सुभानराव जातात. काही क्षण. )

सुनेत्रा: हा भयंकर हलकट माणूस वाटतो मला !

अरविंद: इचारइनीमय नगं ! -- ऐकलंस ना ! काय बरोबर, काय चूक हे बोलायचं असेल तर इथं राहता येणार नाही.

सुनेत्रा: नैतिक भूमिका घ्यायची वेळ आल्यावरही ती न घेणं हेही त्रासदायकच होईल, असं मला वाटतं !

अरविंद: खड्ड्यात जाऊं दे सगळं ! एवढं आता कसंबसं जमवून आणलंय ते मोडून पुन्हा कुठं आता प्रयत्न करत बसायचं ? आणि सगळं बरोबर असं कुठं असणार आहे ? आणि आपण थोडेच जबाबदार आहोत याला ?

सुनेत्रा: मला वाटतं या विषयावर पहिला संघर्ष तुझ्यामाझ्यातच होईल. माझ्या आजूबाजूच्या माणसांचं जगणं हा माझ्या जगण्याचा भाग नाही ?

अरविंद: मला बी इचारइनीमय नगं ! यातनं अमुक एक असंच व्हायला हवं हे मी कोण सांगणारा ? -- हा त्यांचा प्रश्नच शेवटी खरा !

सुनेत्रा: मला तर हे पटत नाही. ( इथे हे दृश्य संपते. पुढचे दृश्य सुरू होते तेव्हा विठू, समोरच्या खिडकीतून बाहेर पाहात उभा. संध्याकाळची वेळ. काही क्षण. नंतर दवाखान्याच्या बाजूच्या दारावर टकटक होते. विठूचे लक्ष नाही. पुन्हा जरा अधिक जोरात टकटक होते. विठू जातो. दोन क्षणांनी परत येतो.)

विठू: डाक्तरसाहेब --

अरविंद: ( स्टडीतून --) काय रे ?

विठू: लच्छी आलीया --

अरविंद: लच्छी ?

विठू: हां --

अरविंद: डॉक्टरीणबाई तालुक्याला गेल्यात म्हणावं. नंतर ये म्हणून सांग तिला. ( विठू जातो. पुन्हा येतो. )

विठू: तुमास्नीच भेटायचं म्हनती --

अरविंद: मला ? आलोच. आत ये म्हणावं तिला. बसायला सांग. ( विठू जातो. येतो. मागोमाग लच्छीही येते.)

विठू: बसाया सांगिटलंय -- ( ती उभी. तोही गोंधळून उभा. बाहेर जातो. पुन्हा येऊन उभा राहतो. पाय स्थिर राहात नाहीत. लच्छी स्मित करते. तो स्थिर उभा राह्यचा प्रयत्न करतो. अरविंद येतो.)

अरविंद: बस, बस, खुर्ची घे ती -- बस ! असं उभं राहिलेलं मला आवडत नाही. विठू खुर्ची दे तिला.

विठू: जी -- ( खुर्ची आणून देतो.)

अरविंद: बस -- ( ती अनिच्छेने बसते.) हं, बोल. ( ती गप्प.) बोल ना -- बोल -- काही घाबरू नकोस -- ( ती विठूकडे पाहते.) अं ? हं -- विठू, तू बाहेर जा. ( विठू गोंधळून बाहेर जातो.) काय लाजतेस काय त्याच्यासमोर बोलायला ? अं ? बोल आता. गेला तो बाहेर.

लच्छी: मालकांस्नी सांगल त्यो -- म्हून ।

अरविंद: तो कशाला असं करेल ? त्याची बायको होणार आहेस ना तू ?

लच्छी: हं --

अरविंद: बरं सांग --

लच्छी: तुमास्नीबी सांगू ने आसं वाटतंया --

अरविंद: मग आलीस कशासाठी ?

लच्छी: डोस्क्याचा भवरा जाला माज्या -- तवा ठरीवलं की सांगावंच तुमास्नी --

अरविंद: मग सांग --

लच्छी: तुमच्याबिगर कुनाला बी सांगता येनार न्हाई त्ये -- कुनालाबी न्हाई --

अरविंद: बरं, भिऊ नकोस -- बोल --

लच्छी: पर तुमच्यापाशीच ऱ्हाया होवं --

अरविंद:	ठीक आहे -- मी कुठंही बोलणार नाही -- तू कसलीही काळजी न करता बोल --

लच्छी:	हा येकच रस्ता हाय माझ्या म्होरं -- म्हून आल्ये -- पयलेच माफी बी करा मस -- ( रडू लागते.)

अरविंद:	ए, हे अवघड होईल. तू इथं येऊन हुंदके दिलेस तर ते उलट विचित्र होईल. तुझं म्हणणं ऐकतोय मी. न भिता बोल.

लच्छी:	तसं तं फिकीर बी नाय मस कसली --

अरविंद:	फक्त माझ्याशीच बोलता येईल असं काहीतरी तुला बोलायचंय -- आणि हे बोलल्याशिवाय गत्यंतरच नाही असं तुला वाटतंय -- बोल ना मग !

लच्छी:	त्यो माजा द्येव न्हाई -- मला पयला संग त्याच्यासंगं नगं --

अरविंद:	म्हणजे इथली प्रथा पाळायची इच्छा नाही तुझी !

लच्छी:	माज्या बाला मारीवलं त्येनं --

अरविंद:	हं --

लच्छी:	खुनी हाय त्यो -- मला द्येवपन न्हाई त्येचं --

अरविंद:	पण मग करणार काय ? तुम्हा लोकांची इथून सुटका होऊ शकत नाही – इथली तुमची नीतीमत्ताही कडेकोट आहे. मोडणार कोण ती ?

लच्छी:	कुनीबी न्हाई --

अरविंद:	मग ?

लच्छी:	कशी हाय मी ?

अरविंद:	तुला मी वाईट म्हणणार नाही. तुला असं वाटणं चुकीचं नाही .

लच्छी:	आता बोलत्येच -- काय बी हूंद्या -- तुमी येकलेच हैसा हितं -- येकच मानूस -- मोडू सकनारा --

अरविंद:	मी ? छे छे ! पण मी तर एक परका बाहेरचा माणूस आहे – मी काय करणार ?

लच्छी:	म्हूनच --

अरविंद:	छे छे ! विठू -- विठू काय म्हणतो ?

लच्छी:	मी त्येला सांगिटलं न्हाई -- त्यो न्हाई म्हनंल -- मालकास्नी सांगल -- त्ये व्हनार न्हाई -- तुमीच हाय फकस्त --

अरविंद:	मी तुला पहिल्यांदा -- नाही, नाही – म्हणजे असलं काही आहे तुझ्या डोक्यात ? मी ?

लच्छी :	म्हून इचारलं -- कशी हाय मी ?

अरविंद:	अग हे मला कशाला विचारतेस -- मी कसं काय ? माझं लग्न झालेलं आहे. माझीही वागायची काही पध्दत आहे.

लच्छी:	डाक्तरीनबाईस्नी न सांगता --

अरविंद:		अरे पण --

लच्छी:		मला ह्ये मोडायचं हाय -- कुनालाबी पत्त्या लागायचा न्हाई -- पर मला बरं वाटंल --

अरविंद:		म्हणून मी ? -- आणि तू हे मोडलेलं कुणालाच कळलं नाही तर उपयोग काय त्याचा ?

लच्छी:		फकस्त माज्या मनात आसं व्हाया होवं -- त्यो पयला न्हवता -- त्येचं द्येवपन व्हायलं न्हाई !--

अरविंद:		समज असलं काही झालं तरी त्याचं देवपण राहिल्याच्या समाधानातच ते राहणार. त्यापेक्षा तू उघड विरोध का नाही करत ?

लच्छी:		मग लगीन व्हनार न्हाई -- म्या जित्तीबी ऱ्हानार न्हाई -- इटूबी रागं यील --

अरविंद:		माझ्या बायकोला धक्का बसेल याचा -- शिवाय --

लच्छी:		कुनालाबी समजनार न्हाई -- फकस्त तुमी आन मी -- दुसरं कुनीबी मला हितं हातबी लावाया घाबरल -- मनचं सांगा -- मी कशी हाय -- सुख दीन --

अरविंद:		ते नाही -- पण असं कधी माझ्या मनातही आलं नाही -- उलट सद्भावना आहेत माझ्या --

लच्छी:		न्हाई म्हनू नगा -- तुमचा भरोसा धरलाय म्या --

अरविंद:		माझा ? छे,छे ! तू फारच विचित्र विचार केलायस. मी माझ्या बायकोला फसवू शकणार नाही --

लच्छी:		माज्या बापाच्या खुन्यासंगं पयला संग करू म्या ! ? -- द्येवपन द्यू त्येला ! ? --

अरविंद :		पण -- म्हणजे मी कसं काय -- काय करणार यात ? माझीही जगायची काही पध्दत आहे. ती मोडल्यानं मलाही मनस्ताप होईल. माझं जीवन विस्कटू शकेल. सुनेत्राला -- माझ्या बायकोला -- तुझ्या प्रश्नाबद्दल किती आस्था आहे ते तुला सांगून कळणार नाही. आणि तिलाच फसवू मी ?

लच्छी:		मंग त्यांस्नी सांगून जमंल ?

अरविंद:		तिला सांगायला माझी जीभच वळणार नाही. मी असा सुखाचा भुकेला आणि बेफिकीर नाही.

लच्छी:		मला वाटलं मी चांगली हाय --

अरविंद:		असलं नको बोलूस. तू छान आहेस, सुंदर आहेस, पण नाही. हे नाही जमणार.

लच्छी:		तुमी येकलेच हैसा हितं येगळे -- म्हून खुलं इचारलया --

अरविंद:		हे समजतंय मला -- पण एक नाजूक प्रश्न सोडवण्यासाठी दुसरा खूप नाश करावा लागेल मला --आणि मुख्य म्हणजे माझ्या वागण्याच्या पध्दतीत हे बसत नाही.

लच्छी:		इचार करा -- बिनती हाय --

अरविंद:		नाही, हे नाही जमणार.

लच्छी:		पटलं तं सांगावा धाडा -- जाऊ मी ?

अरविंद:		हं -- ( लच्छी क्षणभर पाहते. मग जाते. अरविंद सैरभैर. विचारात बसून राहतो. विठू येतो.)

विठू:		( घाबरटपणे -- ) काय म्हनली लच्छी ?

अरविंद: काही नाही. ( विठू पाहतो आणि बाहेर जातो... अरविंद तसाच बसून. इथे हे दृश्य संपते. पुढले दृश्य सुरू होते तेव्हा रात्रीची वेळ. अरविंद समोर सिगरेट ओढत बसलेला. स्वयंपाक घरातून सूनेत्रा येते.)

सुनेत्रा: कसला एवढा विचार करतोयस ? तुझा मूड अजिबात नॉर्मल दिसत नाही -- अं ?

अरविंद: हं --

सुनेत्रा: आपल्याला एकमेकांची मन:स्थिती कळत राह्यला हवी ! --

अरविंद: हं --

सुनेत्रा: लक्ष आहे का तुझं माझ्या बोलण्याकडं ?

अरविंद: हं --

सुनेत्रा: यालाही ' हं ' ?

अरविंद: तुला डिस्टर्ब न करता या बाबतीत कसं वागता येईल तोच विचार करतोय --

सुनेत्रा: कुठल्या बाबतीत ? आणि मी डिस्टर्ब झाले तरी चालेल -- बोल --

अरविंद: आपण प्रेम करतो एकमेकांवर--

सुनेत्रा: म्हणजे विश्वासही हवा एकमेकांवर ! आणि एकमेकांच्या मन:स्थितीचा त्रास घेण्याची तयारीही !

अरविंद: तू एवढं सांगूनही बोललं जात नाहीय --

सुनेत्रा: बोल घडाघडा. काय प्रॉब्लेम आहे ? माझा विचार न करता बोल. विठू म्हणत होता की लच्छी आली होती आणि तुझ्याशी काही बोलत होती. त्यांचं लग्न आठवड्यावर आलंय म्हणे !

अरविंद: ( काही क्षणांनी -- )... तिला पहिला संबंध सुभानरावांशी नकोय. त्यांचं हे देवपण मोडायचंय तिला. त्यांनी तिच्या वडिलांचा खून करवला म्हणून खूप राग आहे तिच्या मनात. इथं कुणीच तिच्याशी संबंध करणं -- लग्नाआधी -- हे होऊ शकणार नाही. हे फक्त मलाच शक्य आहे असं तिचं म्हणणं ! बाकी दुसरं कुणीच नाही. आणि हे मी नाही म्हटलं तर होणारच नाही ! त्यांचं देवपण तिच्या मनात फक्त मोडलं जायला हवंय तिला ! कुणालाही काहीही न कळता !

सुनेत्रा: म्हणजे सरळसरळ तुझ्याशी संबंध मागितला तिनं ?

अरविंद: हो. मी नाही म्हटलं ! हे शक्य नाही म्हटलं ! मी ' काहीतरी ' आहे, माझी जगण्याची काही पध्दत आहे म्हटलं ! त्यात हे बसत नाही म्हटलं ! आणि हे सगळं मी तुझा विचारही न करता बोललो ! कारण ही माझी स्वत:ची भूमिका आहे.

सुनेत्रा: हे तर छानच -- पण तुला या पध्दतीनं का सांगावंसं वाटतंय हे ?

अरविंद: मलाच हे मान्य नाही. शक्य नाही -- हे महत्त्वाचं आहे. हेच आधी सांगायचंय मला --

सुनेत्रा: म्हणजे कदाचित् हा माझा नैतिक प्रश्न होईल का काय, अशी भीती वाटतेय का तुला ?

अरविंद: मला हा माझा ' प्रश्न ' वाटतच नाही. मला ते शक्यच नाही. त्यामुळं हा तुझा प्रश्न होऊच शकत नाही.

सुनेत्रा : तुझ्यात बदल करायचा प्रयत्न मी करावा की करू नये -- हा नाही होत माझा प्रश्न ? नैतिक ? ( क्षणभरानं --) मला तिची व्यथा समजते. तिला काय हवंय ते समजतं. तिच्या मनाची ती न्याय्य मागणी आहे हे लक्षात येतं.

अरविंद: पण माझ्या स्वत:च्या काही मर्यादा आहेत. हे दोष म्हणता येतील ? वडील शिक्षक होते. गरिबीही होती. मुलींकडे मी पाहातही नव्हतो...

सुनेत्रा: ( काही क्षणांनी --) समज मी तुला पूर्ण आश्वासक अशी परवानगी दिली तर ?

अरविंद: म्हणजे इतका वेळ मी जे बोललो त्याच्यावर तुझा विश्वास बसला नाही ? माझ्या मर्यादांबद्दल मी बोलत होतो.

सुनेत्रा: विश्वास बसला नाही असं मुळीच नाही. पण जी एक महत्त्वाची गोष्ट अनिश्चित राहतेय या बोलण्यात ती निश्चित केली तर काय होईल ? तरीही तुझा निर्णय तोच राहील ? खरं तर तू माझ्या दडपणानं विचार करू नयेस या इच्छेनं मी बोलतेय..

अरविंद: मुळात स्त्रीपुरुष संबंध हे शुध्दपणे एकमेकांच्या आकर्षणावरच आधारित असायला हवेत. मी प्रेमावरही म्हणत नाहीय. यातल्या चुकासुध्दा शुध्द चुकाच असल्या पाहिजेत. याला दुसरी कुठलीही कारणं असता कामा नयेत, असं मला वाटतं. अर्थात् हेही माझ्या मर्यादेतलंच असेल ! इलाज नाही !

सुनेत्रा: ते ठीक आहे. पण मला धक्का बसलेला आहेच ! कारण हा लच्छीचा प्रश्न मी तसा बाहेरचा समजत होते. यात आपण काय करावं असा विचार करत होते.. आता हा प्रश्न मी माझा पुढचा क्षण कसा जगावा असा झालेला आहे. आणि स्वत:चा प्रश्न सोडवताना दुसऱ्याच्या मन:स्थितीची दखल घ्यावी लागणारच --

अरविंद: म्हणजे माझी मन:स्थिती !

सुनेत्रा: आणि लच्छीची !

अरविंद: आणि सुभानरावांची ?

सुनेत्रा: त्यांच्या मन:स्थितीमुळंच तर प्रश्न आलाय ना !

अरविंद: बरं, मी काय करावं वगैरे जाऊं दे -- तुझी स्वत:ची काय प्रतिक्रिया आहे याच्यावर -- लच्छीनं माझा संबंध मागण्यावर ?

सुनेत्रा : माझी हरकत नाही ! याला जर तू प्रतिसाद देऊ शकलास तर त्याला मी सुखलोलुपता किंवा प्रतारणा म्हणणार नाही.

अरविंद: आता ही का हवीयत समर्थनं तुला ?

सुनेत्रा : ठीक आहे. ते सुखलोलुपतेतून घडलं तरी मला चालेल.

अरविंद : न्यायाच्या वगैरे गप्पा मारण्याची शिक्षा म्हणून ? की मला असं नेहमीच स्वातंत्र्य राहणार आहे ?

सुनेत्रा: शिक्षा म्हणून नव्हे, न्यायासाठी ! सगळीकडं असं नसेल -- अर्थातच !

अरविंद: तू फारसा विचार न करता -- न्याय, सहानुभूती -- ही काहीतरी महत्त्वाची मूल्यं आहेत असं गृहीत धरून घाईनं बोलतेयस का ?

सुनेत्रा: एकमेकांच्या वागण्याचे आडाखे न बांधता -- अर्थ न लावता -- असं जगता आलं असतं तर !

अरविंद: मी गोंधळलेला आहे आणि तू गोंधळलेली नाहीस -- असं वाटायची परिस्थिती आली नसती ! आणि एक लक्षात घे -- वैयक्तिक रागातनं वागतेय लच्छी ! अन्यायाच्या प्रतिकारासाठी नव्हे --

सुनेत्रा: पण आपल्याला त्याच्याकडं ’ अन्यायाचा प्रतिकार ’ असं पाहता येईल की नाही ?

अरविंद: विचार करावा लागेल--

सुनेत्रा: कुणाकडूनही ज्याची कधीही वाच्यता होणार नाही -- अशा वागण्याचाही तुला त्रास होईल ? की न जाणो वाच्यता झाली तर -- अशी भीती आहे ?

अरविंद: भीतीनं वागायलाही एक धाडसच लागेल ! कुठल्यातरी परिणामांची तयारी लागेलच !

सुनेत्रा: आता याच्याहून निरर्थक काही बोलता येणार नाही.

अरविंद: ( वैतागून --) जाऊं दे ! जे घडेल ते घडेल !

सुनेत्रा: म्हणजे ?

अरविंद: म्हणजे विचार बंद !

सुनेत्रा: माझ्या वैयक्तिक प्रश्नाचं उत्तर मी तुला दिलंय ! तू तिला ’ हो ’ म्हण !

अरविंद: तू वेडी आहेस ! ’ न्याया ’च्या कल्पनेनं पछाडलेली !

सुनेत्रा: ती माझी जबाबदारी !

अरविंद: म्हणजे आता माझं मलाच ठरवावं लागेल ! ( इथे हे दृश्य संपते. पुढचे दृश्य सुरू होते तेव्हा समोर सुभानराव बसलेले. उजव्या हाताला विठू उभा. सुभानराव उठतात. समोरच्या खिडकीजवळ जाऊन उभे राहतात. काही क्षण. वळतात. मग --)

सुभानराव: ( विठूला -- ) तू काय हितं माझ्यावर वाच ठिवायला हुबा हाईस का भडव्या ? भाईर जा तिकडं – लांब -- कोन हिकडं येताना दिसलं तं लगीच यून सांगायचं -- ’ कोन ’ म्हजे कोन ?

विठू: डाक्तरीनबाई --

सुभानराव: हं -- चल -- पळ -- ( विठू जातो. सुभानराव बसतात. स्वस्थ. काही क्षणांनी अरविंद येतो.) डायरेक्ट इषयच सुरू करतो --

अरविंद: सॉरी, तुम्हाला जरा थांबावं लागलं --

सुभानराव: त्ये ठीक हाय -- लच्छी दोनतीन येळा हितं आल्ती आसं समजलं -- म्हनलं काय हाय -- आमच्या नजरंनं त्यो येक प्राब्लेम हाय -- ठावं हाय तुमास्नी -- काय म्हनत व्हती ?

अरविंद: विशेष काही नाही --

सुभानराव: डाक्तरीनबाई नसताना आल्ती आन् बोलत व्हती तुमच्याशी ! -- तुमच्यावं पाळत न्हाई आमची पन तिच्यावं हाये --

अरविंद: म्हणजे कसं ?

सुभानराव: आता तिचा बाप आमच्या चुकीमुळं म्येला ह्ये तर एक फॅक्टच हाय. त्या बाबतीत तिनं आमच्यावं राग धरला तं काय चूक म्हनता यील का ? पन इट्याचं लगीन तिच्यासंगं झाल्यावं पयल्या राती -- परतेपरमानं -- तिला माज्याकडं यायचं हाय. आता यकांदी मुलगी इग्याक न्हाई वाटली तं निस्ता हात लावून बी आमी सोडून द्येतो. पर लच्छीचा प्रश्न येगळा हाय. मस्त हाय ती. तिचा आमच्यावं राग हाये म्हून सोडून द्येन्यासारकं ह्ये न्हाई. मंग आमास्नीबी लई राग यील.

अरविंद: पण मला कशाला सांगताय हे सगळं ?

सुभानराव: न्हाई म्हनलं, ती आजारी त काई न्हाई, आन तरीबी यवडा येळ बोलत व्हती तुमच्या संगं ! तं म्हनलं डायरेक्टच तुमास्नी इचारावं की काय बोलत व्हती ? हितल्या परतेबद्दल तं न्हाई ? तुमच्यामाज्यात काई प्राब्लेमच न्हाई हो, आपुन येकाम्येकाला धरून चालनार ! आपुन इश्वासानं बोललो, वागलो तं गोष्ट येगळी हाय ! पर या लोकांचं येगळं हाय ! यांच्याबद्दल माझा होल्ड तं मला सोडता न्हाई येनार. आमचा होल्ड ढिला पाडनारं येकबी-- कायबी चालनार हाई ! आन हितल्या आमच्या भानगडींचा तुमास्नीबी तरास नगं ही विच्छा हाय ! कशासाटी आल्ती ? काय म्हनत व्हती ?

अरविंद: समजा मला यावर काहीच बोलावं असं वाटत नसेल तर ?

सुभानराव: माजं काय बी म्हननं न्हाई. त्यो काई प्रश्नच न्हाई. फकस्त तुमच्या डोक्याला ताप होऊ ने यवडीच विच्छा हाय. जगामंदी जे जे काय चालतं त्ये समदंच आपल्यास्नी पटतं आनी चांगलं वाटतं आसं काई न्हाई. ह्ये तं तुमी समजताच. तं सांगायचं येकच हाय की आमचं आमी बगून घ्यू. तुमाला यात कायबी वझं न्हाई. आन तरीबी समजा तुमास्नी वाटलं की आमास्नी काई सांगावं -- आमी काय करावं असं तुमाला काई येगळं वाटलं तरीबी आमी तयार हाय. आपल्याआपल्यात बोलू आन ठरवू. अमुकच असा काई आग्रह न्हाई माजा. पन परता तं टिकलीच पायजे ! आमचं द्येवपन न बिघडीवता काय बी जमवू ! आपल्यात काई इरोध न्हाई. मनातबी आनू नगा ! म्हंजे माज्या ठिकानी तुमी हाय इतकंबी चालंल. तुमची विच्छा आसली तं तसं बी जमवू ! तुमी हितं डाक्तर म्हनून आलेत, काई समाजकार्यकर्ते म्हनून न्हाई -- ह्ये तर हाय का न्हाई ? मी काई उगाच तुमच्याशी इतकं आपलेपनानं आन इश्वासानं बोलत न्हाई. आपन यकाम्येकाचं भलंबुरं कशापाई करावं ? निस्तं भलंच कराया हावं ! तसं वागू बी शकतो आपन !

अरविंद: म्हणजे समजा याच बाबतीत काही असलं आणि माझ्या यात काहीही विचार असेल तरी मी आधी तुम्हाला विश्वासात घेतलं तर नीट मार्ग काढता येईल असं तुमचं म्हणणं !

सुभानराव: तिच्या बोलन्याचा इषय हा नसता तं तुमी इतकं बोलला बी नसता वो ! पन जे बोलला त्ये करेक्ट हाय ! राग मानू नगा -- पर इतकंबी सांगून ठिवतो की परता मोडल्यासारकं न व्हता माज्याऐवजी तुमचा जाला पयला संग तिच्याशी तरीबी चालंल ! निस्ता हात लावून तिला तुमच्याकडं द्यू आमी ! परता न मोडता ह्ये बी जमंल ! उगा आपलं मनात आलं त्ये बोलतोय, राग मानू नगासा --

अरविंद हे फार झालं !

सुभानराव: हितं काईतरी लई लफडी आन भानगडी हैत आसं काय बी समजू नगा. तुमी हितं आगदी निर्भयपनानं ऱ्हाऊ शकता. काय बी धोका न्हाई. आन --( विठू येतो.) काय रं भोसडीच्या, मधीच कशापाई आलास ?

विठू: डाक्तरीनबाई आल्या --

सुभानराव: आरं तिच्या ! बरं, ठीक हाय. हा इषय द्या हितंच सोडून ! मला जरा गडबड हाय. आमचा पूर्ण इश्वास हाय तुमावर ! गैरसमज नका हूं द्यू ! ( सुनेत्रा येते.) अच्छा ! जाऊ मी ?

अरविंद: हं --

सुभानराव: अच्छा ! नमस्कार डाक्तरीनबाई ! जरा गडबडीत हाय ! अच्छा !

सुनेत्रा: म्हणजे ?

सुभानराव: चा ऱ्हायलाय ! मान्य ! परत यीन ! अच्छा ! ( जातात.)

सुनेत्रा: ( अरविंदला --) काय विशेष ?

अरविंद: सगळीकडून स्वातंत्र्य आहे. माझं मीच ठरवायचं आहे.

सुनेत्रा: म्हणजे ?

अरविंद: म्हणजे इकडून इच्छा आहे, तिकडून स्वातंत्र्य आहे आणि दुसरीकडूनही स्वातंत्र्य आहे ! सगळ्यांची मोकळीक आहे ! आता सगळीकडे सामसूम आहे ! जणू वाट पाहणारी ! मी काय करतोय याची ! कुठं काही अडथळा नाही, आवाज नाही -- फक्त माझ्या कृतीची प्रतीक्षा आहे ! आता तेवढंच महत्त्वाचं आहे !

सुनेत्रा: म्हणजे ?

अरविंद: कसंही, काहीही असलं, आपलं काहीही म्हणणं असलं, आपण काहीही करू इच्छित असलो तरी त्यांना आधी विश्वासात घेतलं तर सगळं जमवता येईल, असं ते म्हणत होते. सगळं म्हणजे काहीही ! थोडक्यात म्हणजे, ते किंवा मी सगळं बोललो नसलो तरी, न्याय, स्वार्थ, विश्वास, सगळ्यांचं हित आणि सगळ्यांचं समाधान -- असं सगळं जमू शकेल हाच त्याचा अर्थ होता. फक्त त्यांना आधी

विश्वासात घ्यायचं ! बास ! आता हे त्यांचं खरोखरचं आहे की आपले विचार उघडे करून घेण्यापुरतंच आहे, हे कळणं अवघड आहे.

सुनेत्रा: आणि आधी असं विश्वासात नाही घेतलं तर ?

अरविंद: सरळ आहे ! त्यांनी पूर्ण सवलत देऊनही मी जर वेगळंच काही वागलो तर अर्थातच मग माझ्यावर संतापण्याशिवाय मार्गच राहणार नाही त्यांच्यापुढे ! ही सगळी आपुलकी आणि विश्वास म्हणजे एक गर्भित धमकीही असू शकेल !

सुनेत्रा: त्यांना विश्वासात घेणं म्हणजे लच्छीला फसवणं !

अरविंद: आणि लच्छीशी विश्वासानं वागणं म्हणजे त्यांचा विश्वासघात करणं ! ते आपल्याशी इतकं चांगुलपणानं वागत असून !

सुनेत्रा: मग तुला काय वाटतंय, काय करावं ?

अरविंद: या बाबतीतल्या विचारात आता मला कुणाचीच मदत होऊ शकणार नाही. तुझीही नाही. सगळ्यांचं सगळं बोलून झालेलं आहे. आता माझा मीच ...( इथे हे दृश्य संपते. पुढील दृश्य सुरू होते तेव्हा अरविंद एकटा आहे. रात्रीची वेळ. या दृश्यात तो सतत सिगरेट शिलगावणं, ओढणं, झुरके मारणं, धूर सोडणं इत्यादी करत राहतो. येरझाऱ्या मारणे, वगैरे.)

अरविंद: ( स्वगत-- ) खरंच समजा घडली ही घटना -- लच्छीशी संबंध ! -- तर सुनेत्रा खरोखर आत्ता आहे अशीच राहील ? तिला हे जरी न्यायाचं वागणं वाटत असलं तरी प्रत्यक्ष घटना घडल्यावर वैयक्तिक भावना काहीच होणार नाही तिची ? आणि लच्छीचं तरी हे अन्यायाविरुध्द बंड कुठं आहे ? ती तर वैयक्तिक रागानं वागतेय. तिच्या बापाचा सुभानरावाकडून खून झाला नसता तर मग तिचा काहीच विरोध झाला नसता. की अन्यायाविरुध्द काही करायलाही थोडा वैयक्तिक राग लागतोच ? ... सुभानरावांना खरोखरच विश्वासात घेता येईल का याची खात्री नाही. आणि असं झालं तरी या देवाच्या परवानगीनंच लच्छीच्या मनातलं त्याचं देवपण मोडलं, असं होईल ! नाहीतरी लच्छीला ' देवपण मोडणं ' ही तिची मानसिक वस्तुस्थिती व्हायला हवीय -- ते होऊ शकेल ! पण सुभानरावांशी बोलताना हे देवपण मोडण्याचं बोलता येणार नाही. मलाच तिचा पहिला संबंध हवा आहे, असं म्हणावं लागेल. म्हणजे एक प्रकारे त्या दोघांचीही फसवणूक करूनच हे जमणार. गुप्तपणे तर इथं काही होणं अशक्य आहे. पण ते जमेल असं लच्छीला वाटतंय. ती डेस्परेट झालीय -- बेफिकीर झालीय -- माझं तसं कुठाय ? माझं यात वैयक्तिक काहीच नाही. स्वत:सकट सगळ्यांना फसवता आलं तर सगळ्यांचं समाधान होऊ शकेल. इतका खोटेपणा करायची वेळ माझ्या आयुष्यात का यावी ?......एवढी गुंताड्याची मन:स्थिती आणि मुख्य म्हणजे माझा स्वभाव हे लक्षात घेता खरोखर लच्छीबरोबर बेधुंद आनंदानं संबंध होऊ शकेल ? आणि हे सगळं झालं तरी या प्रत्येकाशी वागताना मला मनात अपराधी

भावच भोगावे लागणार ! आणि मला हे जे दिसतंय तेवढंच आणि तसंच असेल हे सगळं ? की या मर्यादा म्हणजेच जगणं !? ( सुनेत्रा येते. पाहते. त्याच्याजवळ येते. त्याचा हात हातात घेते.)

सुनेत्रा: उगीच मनाचा गोंधळ उडवत बसू नकोस. तुझ्या स्वभावाप्रमाणे तुला योग्य वाटेल तसं वाग. मी त्याचे चांगलेवाईट अर्थ लावणार नाही. मी तुझ्याबरोबर आहे. तुला मी जशी हवी आहे तशीच राहीन मी. मी तुला माझी मतंही सांगितलेली आहेत पण ती काही तुला बंधनकारक नाहीत. कारण माझ्याही मनात परस्पर विरुध्द असे विचारही चालू आहेत. माझ्या अपेक्षाही निश्चित नाहीत, हे माझ्या लक्षात येतंय. आपण एकमेकांना दोष द्यायचा नाही. व्यवहार आणि योग्य-अयोग्याचे विचार हे सगळं मिसळून तू वागलास तरी चालेल. शुध्द वागणं असं काही असू शकतं का, हे मलाही समजत नाहीय.

अरविंद: हं...( दवाखान्याच्या दारावर थाप पडते. पुन्हा दार ठोठावले जाते. दोघेही एकमेकांकडे पाहतात. सुनेत्रा उठते, दार उघडते. विठू आत येतो. मानसिक तीव्रता.)

विठू: लच्छी आलीय ! आत्ता ! भेटायचं म्हंतीय ! आत्ता !

सुनेत्रा: पाठव तिला आत आणि तू बाहेरच थांब.( तो जातो. लच्छी येते. निकराची मन:स्थिती. काही क्षण कुणीच काही बोलत नाही.)...बस ...( लच्छी डाव्या हाताला बरीचशी चालत येते आणि थांबते. क्षणभरानं --) मला सगळं माहिती आहे... तुला आता डॉक्टरांचा निर्णय हवाय ...' हो ' किंवा ' नाही '... आमचं खूप बोलणं झालंय याच्यावर... मी डॉक्टरांची पत्नी आहे... आणि एक स्त्रीही आहे... माझा यात कसलाच आग्रह नाही... तुझ्या मनाप्रमाणे झालं तरी मी तुझा तिरस्कार करणार नाही... माझी कसलीच आडकाठी नाही... डॉक्टर जो काही निर्णय घेतील तो बरोबरच आहे असंच मी समजणार आहे... मग तो मला न आवडणारा असो की तुला न आवडणारा ... बोल तू डॉक्टरांशी ... ( जाऊ लागते. अरविंद पाहतो. त्याला -- ) या क्षणी मी तुला कोणतंच सहकार्य देऊ इच्छित नाही... तू स्वतंत्रपणे वाग... (क्षणभर थांबते, जाते. अरविंद दिड्मूढ उभा. लच्छी वाट पाहात उभी. दोन क्षण.)

अरविंद: मला तुझ्याबद्दल अतिशय आपुलकी वाटतेय. प्रेमही वाटतंय... सहानुभूतीही वाटतेय... आणि शिवाय तू सुंदरही आहेसच...( लच्छी उत्सुक...)... खूप विचार केला मी ... आणि मुळात ही अशी विचारानं ठरवून होणारी गोष्टच नाही ... तुझ्या भावनांचा मला कुठलाही अनादर करायचा नाही... पण खरंच... माझ्या वागण्याच्या पध्दतीत बसूच शकत नाही हे ... या बाबतीत आपण होकार द्यावा अशा विचारांनी मनाला ढकलून पाहिलं ...पण नाही... उत्तर ' नाही ' च येतंय...नाही जमणार मला...(लच्छी पाहते...मग त्याच्यासमोर येऊन उभी राहते. तो नाइलाज आणि अपराधी भावना यांत उभा. )

लच्छी: (त्याच्या डोळ्यांत पाहात -- ) ह्ये शेवटचं न्हवं ? म्या पुन्ना न्हाई येनार...हीच येळ हाय.. पुन्ना न्हाई ...

अरविंद: तुझ्या जगण्याच्या ओघात माझा निर्णय महत्त्वाचा ठरायची वेळ यावी आणि यात मी पुरा पडू नये, याचा मला खेद आहे... पण इलाज नाही...(लच्छी वळते. अतिशय तीव्र मन:स्थिती...)

लच्छी: ( अरविंदकडे न पाहता --) जाऊ ? ( तो काही बोलत नाही. ती क्षणभर त्याच्याकडे पाहते. हुंदका दाबते आणि झटकन निघून जाते. काही क्षण अरविंद तसाच हरवल्यासारखा उभा राहतो. मग बसतो. अंग सोडून दिल्यासारखा. दोन्ही हात अस्ताव्यस्त टाकलेले... इथे हे दृश्य संपते. यानंतरचे दृश्य हे एक प्रकारचे स्वप्नदृश्य आहे. रंगीबेरंगी प्रकाश. संथ संगीत. पांढरी गुबगुबीत झालर असलेल्या पोषाखात लच्छी येते. तिच्या स्लो-मोशन, आल्हादकारक, नृत्यविभ्रम हालचाली. पार्श्वभूमीवर अरविंदचे संवाद :-- " तू एक वेडी मुलगी आहेस. अगं, आपापला राग, लोभ, दु:ख, इच्छा -- हे सगळं आपल्या स्वत:च्या मनाचं असतं. याचे प्रश्न सोडवण्यासाठी दुसऱ्या कुणीकुणी कसंकसं वागावं हे आपल्याला कसं ठरवता येईल ? असं असलं तर एकाच माणसाला, एकाच वेळी हजार प्रकारे वागता यावं लागेल नं ! कारण एकाच बाबतीत किंवा एकाच वेळी अनेक लोक त्याच्याकडून वागण्याच्या वेगवेगळ्या अपेक्षा करतील ! असं कसं होईल ! मी कसं वागावं हा प्रश्न मला पडू नये म्हणून तुम्ही सगळ्यांनी अमुक अमुक प्रकारे वागूच नका, असं मला म्हणता आलं असतं ? आपण चुकीच्या पध्दतींनी आपापल्या प्रश्नांकडे पाहिलं, म्हणून आपल्याला काहीच सापडलं नाही, कळलं नाही. आणि बरोबर पध्दत तर आपल्याला माहीतच नाही... हे सगळं काही तुला समजावून देणं शक्यच नव्हतं. तुझ्या रांगड्या रोखठोक धाटणीला या शब्दांचा स्पर्शही होऊ शकला नसता. तू एक तुला स्वत:लाच न झेपणारं असं एक चक्रीवादळ झाली आहेस...''-- इथे हळूहळू लच्छी जाते. अंधार होतो आणि अचानक समोरच्या दारावर जोरात थापा पडू लागतात. अंधुक प्रकाश पडतो. समोर विठू झोपलेला. पुन्हा दारावर जोरात थापा पडतात. विठू जागा होऊन उठून बसतो. )

विठू: कोन हाय ? इतक्या रातीला ...

सुभानराव: ( बाहेरून-- ) विट्या, भडव्या, दार उघड, मी हाय -- ( विठू सगळी वैयक्तिक अवस्था टाकून झटकन उठतो. लगबगीनं जाऊन दार उघडतो. सुभानराव आत येतात--)

विठू: मालक ! --

सुभानराव: डाक्तरसायबास्नी हाक मार... चल-- लौकर--

विठू: ( लगेच -- जोरात --) डाक्तरसायेब --डाक्तरसायेब ऽ ( उजव्या बाजूच्या बेडरूमचं दार उघडून अरविंद बाहेर येतो. सुभानरावांकडे पाहतो. सुनेत्रा येते.)

सुभानराव: वाईट झालं ! कळलं आन लगीच जाऊन बगून आलो ! व्हाया नगं व्हतं त्ये झालंय ! इकतं काय वाटलं न्हवतं -- आता मलाच ह्ये कळंना का या वक्ताला मी ह्ये तुमास्नी कशापायी सांगाया आलो -- जाता जाता सांगावं वाटलं म्हून आलो --

सुनेत्रा: काय झालं ?

सुभानराव: ( कुणाकडेही सरळ न पाहता --) लच्छीनं आत्महत्या केली हाय ! सांगावा आल्यावं लगीच ग्येलो --

अरविंद : म्हणजे किती वेळ झाला ?

सुभानराव: काय जास्त येळ न्हाई जाला ! झाडाला टांगून घ्येतलंय तिनं ! लई वंगाळ ! छ्या !(एका बाजूला अरविंदला -- ) हिकडं आल्ती म्हनं, पर आता त्ये काय बोलू नगा -- ( विठू एकदम बाहेर जायला निघतो, ते पाहून --) थांब, ए भडव्या, तू नगं जाऊस तिकडं -- लच्छीची आई धाय धाय रडतीय थितं -- ती म्हंती की लच्छीला या इट्याशी लगीन नगं व्हतं म्हनून ती म्येली !-- आन् ह्यो गधडा चाललाय थिकडं बगायला -- ( विठू थांबलेला. मग तो दवाखान्याच्या दाराकडे जातो. उभा राहतो. वळतो. खचत खचत खाली बसतो. दोन्ही गुढग्यांत तोंड खुपसून बसतो. मग हळूहळू हुंदके देत राहतो...)आता या बिचाऱ्याला कल्पना तरी आसल का सांगा बरं -- लगीन दोन दिसांवं आल्यालं ! आन् ह्ये आसं झालं ! काय वाईट व्हता ह्यो ? मला तं आगदी योग्य जोडा दिसत व्हता हा ! आन् ह्ये आसं झालं ! तिच्या टकुऱ्यात काय व्हतं ह्ये कसं कळावं हो ? ही मानसं साली लई येडी हाईत ! -- सिद्दं मला सांगावं का न्हाई -- की बाबा ह्यो आमाला नगं -- अवं दुसरा नवरा दिला असता बगून -- आन् इट्याला बी दुसरी दिली असती नवरी ! पन ह्ये काय वाईट व्हतं म्हंतो मी ! यवडी चांगली तरणीताटी प्वार फुकाट म्येली का न्हाई ! काय उपेग झाला ? ... आन् इट्या, तू थिकडं जाऊ नगंस थोडे दीस ... तुजा काई दोष न्हाई पन लच्छीच्या आयला वाटतंय तुज्यामुळं झालं ह्ये ! तिच्यायला सगळी येडी मानसं हैत निसती ! तू ह्यो बंगला सोडून जाऊ नगं कुटं येड्या ! -- च्यायला कुटवर कुनाकुनाची काळजी घ्याची ह्येच कळत न्हाई ! पन वाईट जालं !

अरविंद: भयानक आहे !

सुभानराव: संपलंय वो समदं -- साप चावून म्येली म्हना म्हून सांगून आलोय -- न्हाईतर खा आनखी पोलीसांचा मार -- कुनाकुनाला धरून नेत्याल काय सांगता येनाराय ? -- कळलं काय इट्या --साप चावून म्येली ती --

विठू: ( तसाच -- ) – जी --

सुभानराव: बातमी बी कशी कुटं फुटंल कळत न्हाई वो -- ( क्षणभरानं --) च्यायला या गाडवास्नी संबाळायचं म्हंजे लई तरास हाय ! पन मानसं आपली म्हंतो ना आमी -- म्हून करावं लागतं -- समदं लगीच उरकून घ्या म्हून सांगिटलंय -- आसूं द्या -- जाऊं द्या -- ह्ये आसं आमचं हितलं अडाणी, जाडंभरडं जीवन हाय डाक्तर ! -- तुमाला उगीचच तरास -- पर आमच्यासाटी सहन करा -- माफी मागतो -- गरीब मानसं हैत ही बिचारी ! -- पर तुमचा काई प्रश्न न्हाई -- पडा हवं तं -- मी जातो -- ( जातात. सुनेत्रा वळते. अरविंदकडे पाहते. अरविंद नजर फिरवतो. विठू तसाच बसलेला. ती विठूकडे जाते. खाली बसते. त्याच्या पाठीवरून हात फिरवते. त्यामुळे त्याला अधिकच रडू येते.)

अरविंद: बोल -- माझं काय चुकलंय ? चुकलंय काही ?

सुनेत्रा: ( विठू ऐकतोय हे लक्षात घेऊन -- ) आपण तिला समजावून सांगितलं होतं -- हा तिला अगदी योग्य आहे हेही सांगितलं होतं -- आपल्या परीनं आपण खूप प्रयत्न केला -- तिला हे रद्द करून विठूला दु:ख द्यायचं नव्हतं – पण ती गोंधळलेली होती -- आपणही तिचं मत कुठं बोलू नये असं ती सारखं सांगत होती. आणि ती विठूशी लग्न करणारच नाही, असं काही वाटत नव्हतं तिच्या बोलण्यावरून -- काय तिच्या मनात होतं कोण जाणे ! -- पण असं करायला नको होतं तिनं !

अरविंद: ( काहीसा चकितपणे तिच्याकडे पाहात --) ... म्हणजे... तूही ...( इथं हे दृश्य संपते. पुढले दृश्य सुरू होते तेव्हा सकाळ होते आहे. अरविंद समोर बसलेला. निरनिराळ्या पक्ष्यांचे, चिमण्यांचे आवाज. हे दृश्य संपेपर्यंत हे आवाज मधूनमधून चालूच राहतात. डाव्या बाजूने सुनेत्रा कॉफीच्या तीन कपबशा असलेला ट्रे घेऊन येते.)

सुनेत्रा: विठू ऽ ऽ

विठू : ( दवाखान्याकडून --) जी -- ( येतो.)

सुनेत्रा: तुझी कॉफी घेऊन जा आणि बस दवाखान्यात --

विठू : जी -- ( तसे करतो -- जातो --)

अरविंद: ( सुनेत्राकडून त्याची कपबशी घेत -- ) काल तू ते काय बोललीस सगळं -- लच्छीला विठूशी लग्न करायचं नव्हतं, हे खरं असल्यासारखं ?

सुनेत्रा: आता सुभानराव एकदा असं म्हणणार हे झाल्यावर तेच खरं ठरणार नं ! मग ती आपल्याकडे कशाला येत होती याचं काहीतरी -- मोडकंतोडकं का असेना -- स्पष्टीकरण विठूच्या कानावर जायला नको ? गरीब, साधा, चांगला आहे बिचारा ! त्याच्याकडनं तसा काही धोकाही नाही किंवा तो फारसा काही विचारही करू शकणार नाही. पण त्या चांगल्या माणसाच्या डोक्यात आपल्याबद्दलही काही शंका राह्यला नको ना !

अरविंद: हं -- तसा माझा काहीही दोष नसला तरी मला मनातनं जरा अपराधी वाटतंय ! --

सुनेत्रा: माझी मतं अजून तशीच आहेत, त्यामुळं मीही तुला अपराधी मानणारच -- पण हे एवढंच नाही --

अरविंद: मग ?

सुनेत्रा: माझी मतं जरी तीच असली तरी एक कबूल करावं लागेलच मला -- मी सुखावलेय ! तुझ्या या नकारात्मक वागण्यानं मला सुटका झाल्यासारखं वाटतंय -- आणि हे लक्षात आल्यामुळं मलाही अपराधी वाटतंय --

अरविंद: आपण आता आधी होतो तसेच राहणं शक्य नाही -- या प्रकाराचं ओझं साठलंच आता मनात – ( काही क्षणांनंतर...)... आणि तूही तुझ्या अपराधी भावनेचं जे बोलतेयस ते माझं मन सांभाळण्यासाठी तर

तर नाही ?

सुनेत्रा: मला वाटतं इतक्या स्वच्छ जगण्याची अपेक्षा करताच येणार नाही -- आपलं आपल्यालाही पूर्ण स्वच्छपणे काही कळणं अशक्यच वाटतंय --

अरविंद: लच्छी इकडे कशाला येत होती ते तिच्या आईजवळ बोलली असली तर ? त्या एका व्यक्तीला तरी हे माहीत असणार !

सुनेत्रा: त्याचा काही फरक पडणार नाही -- आणि आपला काय विशेष संबंध येणाराय ? -- आणि सुभानराव म्हणतायत तेच सत्य हे तर स्वीकारूनच जगावं लागेल तिला, त्यामुळं, तो प्रश्नच नाही --

अरविंद: इथं राहणं तर भागच आहे सध्या ...

सुनेत्रा: त्याला काही इलाज नाही ...मला फक्त एकच प्रश्न भेडसावतोय ...आणि तो म्हणजे साप ! ... सापांची भीती...

अरविंद: सुभानराव सारखं सांगत होते ते आपण अजून केलंच नाही ... वेखंड आणून ते जाळू या आपण घरात ...वेखंडाचा वास असला की साप येणार नाहीत ...

सुनेत्रा: आज आधी ते वेखंडांचंच बघते मी ...( ती कपबशांचा ट्रे घेऊन आत जाते. विठू त्याची कपबशी घेऊन आत जातो. अरविंद बसून ... पडदा पडत जातो...)

**-- समाप्त --**

--- ००० ---

**सूचना :- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

पत्ता :- चं.प्र.देशपांडे,

फोन -- ९३७१००५७७३.

ईमेल – champrade@gmail.com

संकेतस्थळ – www.champralekhan.com